


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# भारतासमोर आज दक्षिण आफ्रिकेचे आव्हान

**अहमदाबाद : (समर्थ गांवकरी)**

साखळी फेरीतील आपले चारही सामने जिंकूनही भारतीय संघासमोर काही प्रश्न निर्माण झाले असून त्यांची उत्तरे शोधण्याचा आता त्यांना प्रयत्न करावा लागणार आहे. याची सुरुवात 'अव्वल आठ' फेरीतील आज, रविवारी होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्याने होईल. या वेळी सलामीवीर अभिषेक शर्मा, कर्णधार सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांसह सर्वच भारतीय फलंदाजीचा कस लागणार आहे.

गतस्पर्धेत अंतिम फेरीत खेळलेले भारत आणि दक्षिण आफ्रिका हे संघ आता 'अव्वल आठ' फेरीतील पहिल्याच सामन्यात समोरासमोर येतील. हा सामना सव्वा लाख आसनक्षमता असलेल्या अहमदाबाद



येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे. दक्षिण आफ्रिकेकडे कगिसो रबाडा, लुंगी एन्गिडी, मार्को यान्सन, केशव महाराज आणि एडीन मार्करम असे चांगले गोलंदाजी आक्रमण आहे. त्यामुळे भारतीय फलंदाजांना कामगिरी उंचवावी लागेल.

भारतीय संघाला साखळी फेरीत प्रतिस्पर्ध्यांनी झुंज दिली, पण मोक्याच्या क्षणी खेळ उंचावण्यात भारताचे खेळाडू यशस्वी ठरले. असे असले तरी फलंदाजांना फारशी समाधानकारक कामगिरी करता आलेली नाही. सलामीवीर इशान किशन (दोन अर्धशतके आणि २०२ स्ट्राइक रेट) चांगल्या लयीत आहे. अन्य फलंदाजांना मात्र कामगिरी उंचवावी लागेल. अभिषेक शर्मा सलग तीन सामन्यांत शून्यावर बाद झाला आहे. सूर्यकुमार व तिलक यांनी योगदान दिले आहे. मात्र, ज्या खेळपट्टीवर चेंडू थांबून येतो अशा ठिकाणी हे दोघे फारसा प्रभाव पाडू शकलेले नाहीत. अखेरच्या षटकांत हार्दिक पंड्या (स्ट्राइक रेट १५५) आणि शिवम दुबे (स्ट्राइक रेट १७८) दमदार कामगिरी करत आहेत. या दोन्ही अष्टपैलूंकडून संघाला अपेक्षा असतील. अभिषेक सलग दोनदा ऑफ-स्पिन गोलंदाजाविरुद्ध बाद झाला आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार मार्करम 'पॉवर-प्ले'मध्ये गोलंदाजीस येतो का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

जसप्रीत बुमरा आणि वरुण चक्रवर्ती यांची आठ षटके महत्त्वपूर्ण ठरतील. चक्रवर्तीने चार साखळी सामन्यांत नऊ बळी मिळवले आहेत.

बुमराने जे तीन सामने खेळले, त्यामध्ये त्याने प्रभावी गोलंदाजी केली. अहमदाबादच्या संथ खेळपट्टीवर अर्शदीप सिंगच्या जागी कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदरच्या जागी अक्षर पटेलला संधी मिळू शकते.

### अभिषेकची चिंता नाही – सूर्यकुमार

अहमदाबाद : अभिषेक शर्मा ट्वेन्टी-२० विश्वचषकातील आपल्या पहिल्या धावेच्या प्रतीक्षेत असला तरी, त्याच्या कामगिरीची आपल्याला चिंता नसल्याचे कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला. "मला अभिषेकच्या लयीची चिंता नाही. उलट त्याची चिंता करणाऱ्यांचीच मला अधिक काळजी वाटते. गेल्या वर्षी अन्य खेळाडू अपयशी ठरत असताना अभिषेकने संघासाठी निर्णायक खेळी केल्या. आता त्याला संघाच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे आणि अशा गोष्टी घडत असतात," असे सूर्यकुमारने सांगितले.

### तिलक, सूर्याकडे विशेष लक्ष

डावखुऱ्या तिलकला साखळी फेरीत प्रभाव पाडता आला नाही. पाकिस्तानविरुद्ध २४ चेंडूंत २५ धावा, नामिबियाविरुद्ध २१ चेंडूंत २५ धावा आणि नेदरलँड्सविरुद्ध २७ चेंडूंत ३१ धावा अशी त्याची कामगिरी होती. मात्र, त्याला मोठी खेळी करता आलेली नाही, शिवाय खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर धावगतीही वाढवता आलेली नाही. सूर्यकुमारने सलामीच्या लढतीत अमेरिकेविरुद्ध ४९ चेंडूंत ८४ धावांची खेळी केली होती. मात्र, इतर सामन्यांमध्ये त्याने निराशा केली. त्यामुळे या दोघांना अधिक आक्रमकता दाखवावी लागेल.

## थोडक्यात...

### कोकणच्या जलवाहतुकीचा नवा अध्याय

सावंतवाडी (समर्थ गांवकरी) : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाला गती देणारा मुंबई-विजयदुर्ग हा जलमार्ग अखेर 1 मार्चपासून सुरु होत आहे. कोकणवासीयांसाठी हा प्रवास अधिक सोयीस्कर, जलद आणि आरामदायी होणार असून, या सेवेच्या पहिल्या प्रवासात सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे स्वतः सहभागी होणार आहेत. 1 मार्च रोजी ते प्रवाशांसोबत एम2एम फेरीतून मुंबई ते विजयदुर्ग असा प्रवास करतील. नवीन वेळापत्रकानुसार, 1 मार्च रोजी सकाळी 8 वाजता ही फेरी मुंबईहून सुटेल आणि दुपारी 3 वाजता विजयदुर्ग येथे पोहोचेल. तर परतीचा प्रवास दुपारी 12 वाजता विजयदुर्गहून सुरु होऊन सायंकाळी 7 वाजता मुंबईत संपेल. मार्च महिन्यात ही सेवा ठराविक दिवशी उपलब्ध राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### कोकणात विद्यार्थी संख्येत घट!

पुणे (समर्थ गांवकरी) : दहावी-बारावीचा सर्वाधिक निकाल लागणारा विभाग अशी ओळख असलेल्या कोकण विभागीय मंडळातून प्रत्यक्षात दहावीची आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या दशकभरात झपाट्याने कमी झाली आहे. विद्यार्थी संख्या रोडावण्यामागे रोजगाराचा अभाव आणि त्यापायी पुढील शिक्षणासाठी शालेय पातळीवर असतानाच स्थलांतर हे महत्त्वाचे कारण असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कोकण विभागीय मंडळात रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश होतो. 2012 मध्ये कोकण विभागीय मंडळाची स्थापना झाली.

# सर्व खासगी रुग्णालयांना गर्भवतींची तपासणी करावी लागणार

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

गेल्या तीन वर्षांत राज्यात जन्मजात व्यंग्य हे पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक म्हणून समोर आले आहे. जन्मजात व्यंगामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी व गर्भातील जन्मजात व्यंग शोधण्यासाठी ॲनॉमली स्कॅन तपासणी आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केले आहे. विभागाने सर्व खासगी रुग्णालयांना याबाबत निर्देश दिले आहेत.

आरोग्य विभागाने २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ (ऑक्टोबर २०२५ पर्यंत) राज्यातील बालमृत्यूंचे विश्लेषण केले. याचा बालमृत्यू विश्लेषण व विश्लेषण अहवाल आरोग्य विभागाने तयार केला आहे. त्यानुसार, राज्यात गेल्या तीन वर्षांत जन्मजात व्यंग हे बालमृत्यूच्या पहिल्या पाच प्रमुख बालमृत्यूंच्या कारणांपैकी एक असल्याचे



निष्पन्न झाले. राज्यात गेल्या तीन वर्षांत झालेल्या बालमृत्यूंपैकी सुमारे ६.५ टक्के जन्मजात व्यंगामुळे झाले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने गर्भातील जन्मजात व्यंग तपासण्यासाठी केले जाणारे ॲनॉमली स्कॅन आवश्यक असल्याच्या सूचना केल्या आहेत.

आरोग्य विभागाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर केला आहे.

### खासगी रुग्णालयातील ॲनॉमली स्कॅनसाठी नियम

- सर्व गर्भवतींची १८ ते २० आठवड्यांच्या कालावधीत तपासणी करावी.
- गर्भवती व तिच्या कुटुंबीयांचे समुपदेशन करून त्यांना तपासणीस प्रवृत्त करावे.
- ॲनॉमली स्कॅनचा खर्च गर्भवतीच्या कुटुंबीयांकडून घ्यावा.
- या तपासणीसाठी सरकारकडून खासगी रुग्णालयांना अनुदान मिळणार नाही.
- तपासणी करताना लिंगनिदान नियमांचे उल्लंघन करू नये.
- गर्भात व्यंग आढळून आल्यास गर्भपातासाठी समुपदेशन करावे.

त्यानुसार, गर्भवतींचे ॲनॉमली स्कॅन १८ ते २० आठवड्यांच्या कालावधीत करावे. ही तपासणी सर्व सरकारी रुग्णालयात २०२४-२५ पासून मोफत करण्यास सुरूवात झाली. गर्भवतींचे ॲनॉमली स्कॅन करण्यासाठी सर्व सरकारी रुग्णालयात आवश्यकतेनुसार सोनोग्राफीची सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यातून जन्मजात व्यंग घेऊन जन्माला येणाऱ्या अर्भकांचे प्रमाण कमी झाले. मात्र, राज्यातील एकूण प्रसूती व प्रसूतीपश्चात सेवांपैकी ५० टक्के सेवा खासगी रुग्णालयात दिल्या जातात. त्यामुळे खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गर्भवती ॲनॉमली स्कॅनपासून वंचित राहू नयेत, याची खबरदारी खासगी रुग्णालयांनी घ्यावी. सर्व रुग्णालयांनी ही तपासणी करावी. गर्भात जन्मजात व्यंग राहिल्यास गर्भपात करण्यासाठी गर्भवतीचे समुपदेश रुग्णालयाने करावे.

# पक्षी गणनेत सिंधुदुर्ग जिल्ह्याचा महाराष्ट्रात सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक

**सावंतवाडी : (समर्थ गांवकरी)**

जागतिक स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या 'ग्रेट बॅकयार्ड बर्ड काउंट' या पक्षी गणनेत सिंधुदुर्ग जिल्ह्याने सलग तिसऱ्या वर्षी महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या पक्षी गणनेत तीन नवीन पक्षी मिळाल्याने जिल्ह्याची एकूण पक्षी संख्या ४२८ झाली आहे. त्या मुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या निसर्गवैविध्यात मोलाची भर पडली आहे. या जागतिक स्पर्धेत पुणे जिल्हा २६७ प्रजातींसह दुसऱ्या, तर रायगड २१० प्रजातींसह तिसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. १३ ते १६ फेब्रुवारी दरम्यान जगभर राबवण्यात आलेल्या या उपक्रमात महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांनी सहभाग घेतला होता.या चार



दिवसाच्या ३१५ पक्षी नोंद झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ८ तालुक्यांमधून एकूण ४० निरीक्षकांनी ४५ वेगवेगळ्या ठिकाणी हे पक्षी निरीक्षण केले. ओरोस येथील पक्षी निरीक्षक सचिन प्रभू यांनी राज्यात सर्वाधिक २६४ प्रजातींची नोंद केली. त्याखालोखाल मकरंद नाईक (२३३ ), प्रवीण सातोसकर (२३०) यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

यावर्षीच्या पक्षी गणनेत झाली असून यामुळे सिंधुदुर्ग च्या एकूण प्रजातींची संख्या ४२८ वर पोहोचली आहे.

# शरद पवारांबद्दल आदरच, पण विलीनीकरणाचे काय?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाविकास आघाडीच्या वाट्याला आलेली एकमेव राज्यसभेची जागा कोणाच्या वाट्याला जाणार यावरून कुरघोडी सुरू झाल्या आहेत. शिवसेना (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी पुन्हा एकदा यावर दावा करीत राज्यसभेची जागा ही शिवसेनेचीच असल्याचे स्पष्ट मत मांडले. शिवसेनेचे (ठाकरे) आमदार, खासदारांनीही ही जागा शिवसेनेची आहे आणि ती शिवसेनेकडेच राहिली पाहिजे असे मत व्यक्त केले असल्याचे ते म्हणाले. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्याविषयी आदरच असल्याचे सांगताना त्यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावरही बोट ठेवले. व्यक्ती म्हणून शरद पवारांसोबत आदर आहे, मात्र आम्ही पक्ष म्हणून बोलत आहोत. दोन पक्षांचा विचार केला तर आता सध्या महाराष्ट्रात काय परिस्थिती आहे, कोणत्या युत्या आणि



कोणत्या आघाड्या आहेत. यावर सुद्धा जरा लक्ष देणे गरजेचे आहे. एका बाजूला विलिनीकरणाचा विषय सुरू आहे. दुसऱ्या बाजूला जर आपण पाहिले तर आताच ज्या महापालिकेच्या निवडणुका होऊन गेल्या, त्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्या. मुंबईतही एक राष्ट्रवादी (शरद पवार गट) आमच्यासोबत लढली आणि एकनाथ शिंदेंना पाठिंबा दिला, असे सांगताना त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या भूमिकेबाबत संभ्रम असल्याचे सूचित केले.

# आज अकोल्यात महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात रविवारी (२२ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता अकोल्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मैदानावर विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आणि लाभ वितरणाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महामेळावा राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या विशेष निर्देशान्वये अहिल्यानगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व अकोले तालुका विधी सेवा समिती तसेच जिल्हा व तालुका प्रशासनासह शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने आणि अकोले व राजूर तालुका वकील संघाच्या सहकार्याने अकोले तालुक्यातील रहीवासी नागरिकांसाठी हा कार्यक्रम आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती तथा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती श्री. रोहित जोशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तर अहिल्यानगरचे प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष आशिष पाटील, जिल्हाधिकारी पंकज आशिया (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (भा.पो.से.), जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन निमंत्रक अहिल्यानगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव योगेश पैठणकर, अकोले न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठस्तर) धिरज हिंग्लजकर, तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड वसंतराव मनकर यांनी केले. यासंदर्भात अकोल्यातील शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी अकोले तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड वसंतराव मनकर यांच्यासमवेत ॲड बी.जी. वैद्य, ॲड भाऊसाहेब नवले, ॲड के. बी. हांडे, ॲड आर. डी. नवले, ॲड चंद्रकांत सुपे, ॲड ज्ञानेश्वर काकड, सुरेश करवा आदी उपस्थित होते. ते म्हणाले, विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत मिळवून देण्याबाबत विधी सेवा प्राधिकरणाकडून केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना एकाच ठिकाणांहून उपलब्ध करुन त्यांची सत्वर अंमलबजावणी करण्याचे आयोजन या विधी सेवा महाशिबीरातून होईल. शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी असलेल्या योजनांबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात येईल. यातून पात्र लाभार्थ्यांची नोंदणी, अर्ज स्वीकृती व तत्काळ मंजुरीनंतर प्रक्रियेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

या महामेळाव्यातून विधी सेवा समिती, महसूल, पंचायत समिती, समाजकल्याण, कृषी, महिला व बालविकास, आरोग्य, कौशल्य विकास, उद्योग व दिव्यांग विभागासह विविध विभागांचे स्टॉल उभारले जाणार आहेत. शिबिरात तज्ज्ञ अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या शंकांचे निरसन करतील. शासनदरबारी अकोले तालुकयातील नागरिकांचे काही अर्ज वा प्रकरणे प्रलंबित असतील तर त्याबाबतची माहिती अकोले न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती यांना त्वरित द्यावी. या महाशिबीर व महामेळाव्याचा लाभ लाभार्थीपर्यंत पोहचलेच याबाबत जनजागरण मोहीम राबविण्याचे आवाहन वकील संघ व सुजाण नागरिकांना न्यायालयीन यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर सरपंच प्रशासक

### सरपंचांना लॉटरी: सरकारचा महत्वाचा निर्णय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरपंचांना नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याआधी निवडणूकांचा निकाल लागेपर्यंत प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रशासक म्हणून अधिकाऱ्यांची नेमणूक करणे अडचणीचे ठरणार असल्याने या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान 'सरपंचाला' नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांनंतर आता प्रतीक्षा आहे ती ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची. राज्यातील सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुका येत्या काळात होणार असून यातील काही ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ तर काहींची मुदत फेब्रुवारीमध्ये संपत आहे. जानेवारी २०२५ पासून फेब्रुवारी २०२६ या दरम्यान मुदत



संपलेल्या ग्रामपंचायतींची संख्या जवळपास १६०० ते १७०० च्या आसपास आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील ५० टक्क्याहून अधिक आरक्षणाचा मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका लांबणीवर टाकाव्या लागणार आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून सरपंचांना नेमण्याचा निर्णय घेतला आहे.



# विविध आरोग्य शिबिरांचे यशस्वी आयोजन

## १०० रक्तदाते, २० मोतीबिंदू शस्त्रक्रिया, २२० रुग्णांची मोफत तपासणी

**ब्राह्मणवाडा : (समर्थ गांवकरी)**



सन्माननीय श्री शंकरजी गायकर साहेब ( राष्ट्रीय प्रवक्ते तथा सह मंत्री विश्व हिंदू परिषद)यांच्या संकल्पनेतून आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाउंडेशन संचलित श्री सुखप्रदा हॉस्पिटल, ब्राह्मणवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. 19 फेब्रुवारी रोजी भव्य रक्तदान शिबिर, मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीपणे पार पडले.

रक्त_शिव_मावळ्यांचे या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे 100 रक्तदात्यांनी रक्तदान करून आपल्या लाडक्या राजाचा जन्मोत्सव सामाजिक उपक्रमातून साजरा केला. हे रक्तदान शिबिर हरिश्चंद्र अर्पण ब्लड स्टोरेज सेंटर यांच्या सहकार्यातून संपन्न झाले.

त्याच दिवशी झालेल्या नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरालाही उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. यामध्ये सुमारे 120 रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीतून 20 रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर तात्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली.

सदर तपासणी व शस्त्रक्रिया सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया तोरकडी मॅडम व इतर तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत, रोटरी दर्शन संगमनेर यांच्या सहकार्याने पार पडल्या.

दि. 20 फेब्रुवारी रोजी मेडिकव्हर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मोफत सुपर स्पेशालिटी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात डॉ. जगदीश वाबळे (MD मेडिसिन), डॉ. अमेय इथापे (इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट), डॉ. पंकज नंदागवळी (जनरल व लॅप्रोस्कोपिक सर्जन), डॉ. अमित सुर्वे (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. सागर कोटकर (स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ), डॉ. अतुल पवार (युरो सर्जन) व डॉ. पायल रांगरेज (फिजिओथेरपिस्ट) यांनी रुग्णसेवा बजावली. या शिबिरामध्ये सुमारे 220 रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन अकोले तालुका मेडिकल असोसिएशन, निमा अकोले–संगमनेर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राह्मणवाडा व ग्रामपंचायत कार्यालय, ब्राह्मणवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या उपक्रमांमुळे ग्रामीण व दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होऊन छत्रपती शिवाजी महाराज जयंती सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साजरी करण्यात आली.



# ब्राम्हणवाडा जिल्हा परिषद शाळेस सामाजिक बांधिलकीतून चटईंचे वाटप!

**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, ब्राम्हणवाडा येथे शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी चटईंचे वाटप करण्यात आले. स्थानिक मान्यवरांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी मुक्तार मनियार (उद्योजक), नवनाथ पवार (लहुजी शक्ती सेना तालुका अध्यक्ष), सुधीर वाघमारे, अब्दुल्ला अन्सारी, रवींद्र पाबळे (श्री ईरिगेटर्स, ओतूर) तसेच डॉ. नीलेश कडाळी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना चटईंचे वितरण करण्यात आले. शाळेत आवश्यक साहित्याची गरज ओळखून या मान्यवरांनी सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध होणार असून शैक्षणिक वातावरण अधिक सुसज्ज होणार आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय गोपाळे सर व सोपान हुळवले सर यांनी उपस्थितांचे आभार मानत अशा उपक्रमांमुळे शाळेच्या प्रगतीस मोठी मदत होत असल्याचे सांगितले.

# पुण्यात संसदीय राजभाषा समितीच्या तिसऱ्या उप-समितीचा निरीक्षण कार्यक्रम



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारच्या माननीय संसदीय राजभाषा समितीच्या तिसऱ्या उप-समितीचा निरीक्षण कार्यक्रम १८ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पुण्यात पार पडला. या कार्यक्रमांतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रधान कार्यालयात राजभाषा हिंदीच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या निरीक्षण कार्यक्रमाचा उद्देश केंद्र सरकारच्या कार्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि वित्तीय संस्थांमध्ये राजभाषा धोरणांची अंमलबजावणी, हिंदीतील कार्यालयीन कामकाज, पत्रव्यवहार, प्रशिक्षण व जनसंपर्क यासंबंधीची स्थिती तपासणे हा होता. उप-समितीच्या सदस्यांनी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांशी चर्चा करून विविध बाबींचे सादरीकरण ऐकून घेतले.

कार्यक्रमादरम्यान राजभाषेच्या वापरात झालेली प्रगती, अडचणी तसेच पुढील सुधारणा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच हिंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला.

संसदीय राजभाषा समितीचे हे निरीक्षण दौरे केंद्र सरकारच्या राजभाषा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे मानले जातात. पुण्यातील या निरीक्षण कार्यक्रमामुळे संबंधित कार्यालयांना राजभाषा कार्यात अधिक सक्षम होण्यासाठी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# ज्येष्ठ पत्रकार विक्रांत आढाव यांचे निधन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा पत्रकारितेत आपली ठळक ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार विक्रांत आढाव (वय ५२) यांचे शनिवारी (ता. २१) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यातील पत्रकारिता क्षेत्रासह क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे.

# श्री महादेव मंदिर येथे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



कुमशेत येथे श्री महादेव मंदिर या ठिकाणी शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी दर्शन व महाप्रसाद घेतल्यानंतर विविध धार्मिक कार्यामध्ये सहभाग घेतला.

सकाळी पहाटे ५ वा. पासून भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. यानंतर पूजा विधि झाल्यानंतर अभिषेक सुरू झाला.

सकाळी ठीक १० वा.मंदिरासमोरील पटांगणमध्ये शिवलीला अमृत पारायण वाचायला भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यावेळी ज्येष्ठ भाविक भक्ताने यावेळी सांगितले की , शिवलीलामृत पारायण हे भगवान शंकराची कृपा आणि इच्छापूर्तीसाठी विशेषतः श्रावण, सोमवार किंवा महाशिवरात्रीला केले जाणारे पवित्र वाचन आहे. १४ अध्याय आणि २४५३ ओव्यांचा हा ग्रंथ भक्तीभावाने, सात्विकतेने, स्नान करून आणि ब्रह्मचर्य पाळून वाचल्यास मनोकामना पूर्ण होतात. पारायणापूर्वी संकल्प करून पोथीची पूजा करावी आणि वाचनानंतर 'ओम नमः शिवाय' जप करावा .

उजव्या हातात पाणी, अक्षता आणि फूल घेऊन, महादेवाच्या समोर आपले नाव, गोत्र आणि मनोकामना सांगावी .

शिवलीलामृत अकरावा अध्याय भद्रासेनाची कथा रोज वाचल्याने अपमृत्यू टळतो, दीर्घायुष्य लाभते आणि शिवलोकाची प्राप्ती होते. हा अध्याय संकटमुक्ती, मान-सन्मान आणि सौभाग्य प्राप्तीसाठी अत्यंत प्रभावी मानला जातो . दररोज किंवा विशेषतः सोमवारी हा अध्याय वाचल्याने घरातील नकारात्मकता दूर होऊन इच्छित फळ मिळते . सायंकाळी ठीक ६ वा.ज्ञानेश्वरी हरिपाठ सामुदायिक घेण्यात आला . यानंतर सायंकाळी ७ वा.भव्य महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला .

जय अंबिका भजनी मंडळ कुमशेत यांनी हरी शिव जागर सादर केला .रात्री ठीक ११ : ४५ बहुसंख्येने उपस्थित असलेल्या भाविकांकडून महाआरती घेण्यात आली . यावेळी हर हर महादेव .... ओम नमः शिवाय.... जय जय शिवशंकर या नामाचा गजर करण्यात आला.

# स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशनचे राज्यस्तरीय खुले अधिवेशन संपन्न!

## डॉ. विश्वासराव आरोटे : एकजूट संघटनेच्या बळावर स्पर्धात्मक काळात यशस्वी लढा शक्य!





**वरोरा (चंद्रपूर) : (समर्थ गांवकरी)**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर असोसिएशनचे राज्यस्तरीय संपादक व पत्रकारांचे खुले अधिवेशन उत्साहात संपन्न झाले. राज्यातील विविध विभागांतून आलेल्या संपादक व पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती यावेळी लाभली.

अधिवेशनात लघु व मध्यम वृत्तपत्रांसमोरील सध्याची आव्हाने, डिजिटल माध्यमांची वाढती स्पर्धा, शासकीय जाहिरात धोरण, तसेच पत्रकारांच्या हक्क व संरक्षण या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बदलत्या आणि स्पर्धात्मक काळात टिकून राहण्यासाठी संघटनेची एकजूट व सामूहिक विचार महत्त्वाचा असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी, "एकजूट संघटना आणि एक विचार ठेवला तर भविष्यातील स्पर्धात्मक काळात आपण निश्चितच यशस्वी लढा देऊ शकतो," असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी पत्रकारांनी परस्पर सहकार्याची भावना जोपासून संघटनेला अधिक बळकट करण्याचे आवाहन केले.

अधिवेशनात विविध विभागांतील प्रतिनिधींनी आपले अनुभव मांडले तसेच पत्रकारितेतील नैतिकता, विश्वासार्हता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यावरही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप एकतेचा संदेश देत करण्यात आला.

# महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

**ओतुर : (समर्थ गांवकरी)**

किल्ले शिवनेरीवर आयोजित शासकीय शिवजयंती सोहळ्यात जि प प्राथमीक शाळा ओतूर नंबर एकच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन लेझीम प्रात्यक्षिकाद्वारे घडवून उपस्थितांची मने जिंकली. महाराष्ट्राचा सांस्कृतिक ऐतिहासिक आणि शैक्षणिक वारसांचे अप्रतिम सादरीकरण लेझीम प्रात्यक्षिकाद्वारे उपस्थित महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व सुनेत्रा पवार,सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, किल्ले शिवनेरीचे आमदार शरद सोनवणे, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे विस्ताराधिकारी धोंडगे, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे यांनी टाळ्यांची दाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# आगर येथे श्री महादेव मंदिराचा कलशारोहण व प्राण प्रतिष्ठान सोहळा संपन्न

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**



कुकडी नदीच्या तीरावर वसलेले वैकुंठ भूमी , बुवासाहेब पाणवठा आगर येथे श्री महादेव मंदिराचा कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा सोहळा शनिवार दि.१४ रोजी पीरयोगी अजय नाथ व गुरु पीरयोगी सरनाथ बापू पंथ सतनाथ यांच्या हस्ते भाविकांच्या उपस्थितीत पारंपारिक वाद्यासह मोठ्या उत्साहात कार्यक्रम पार पडला .

येथील परिसरातील मुलींनी व महिलांनी घरापासून ते मंदिरापर्यंत सुंदर रांगोळी चित्र काढण्यात आले . स. ८ वा . मांडव डहाळे , स . ९ :३० वा . मूर्तीची मिरवणूक व शोभा यात्रा यावेळेस महिला भगिनींनी डोक्यावर तुळस व कळशी घेऊन शिवनाम जप केला ., स . ११ ३० वा . गणेश पूजन, पुण्याहवाचन , मातृकापूजन , प्रधानन मंडल पूजन , नवग्रह पूजन , शिवलिंगासस्नापन , जलाधिवास व संस्कार . दु. २ :३० वा. होम हवन , सायं. ५ वा . क्षेत्रपाल पूजन व बलिदान . सायं . ६ :२१ मि. शिवलिंग प्राणप्रतिष्ठा कलशारोहण भव्य कार्यक्रम संपन्न झाला .यानंतर हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत महाआरती व भव्य महाप्रसादाचा आयोजन रात्री ठीक नऊ वाजता आगर ग्रामस्थ यांनी हरी भजनाचा कार्यक्रम सादर केला. रविवार दि. १५ रुद्र अभिषेक व संपन्न झाल्यानंतर महाप्रसादाचा दु . १२ वा .भैरवनाथ भजन मंडळ माळुंगे पडवळ तर्फे नारायणगाव यांनी शिवभजनाचा जागर केला .

या कार्यक्रमांमध्ये ॐ नंम शिवाय , हर हर महादेव , जय भोलेनाथ, जय शिवशंकर असा नाम मंत्र जप सातत्याने करण्यात आला . या कार्यक्रमाचे नियोजन समस्त ग्रामस्थ आगर यांनी केले .

# सँडोज कंपनीमध्ये समर्थ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची निवड



**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे या औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाच्या ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल च्या वतीने नुकतेच पूल कॅम्पस ड्राइव्ह २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये फार्मसी च्या अंतिम वर्षातील २६ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग दर्शविला. मुलाखतीमध्ये समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी तसेच परिसरातील औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांची प्रथम फेरीमध्ये लेखी परीक्षेद्वारे निवड करण्यात आली.त्यानंतर वैयक्तिक मुलाखतीच्या फेऱ्या यशस्वीपणे पार केल्या. यामध्ये महाविद्यालयातील ४ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले यांनी दिली.

सँडोज कंपनीचे एच आर समीर चव्हाण व प्रॉडक्शन हेड प्रदिप गाडे यांनी मुलाखतीची सर्व निवड प्रक्रिया पूर्ण केली.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ दिनदर्शिकेचे विदर्भात भव्य प्रकाशन!

## वर्धा–चंद्रपूरच्या पत्रकारांच्या संपादनातून साकारलेली विशेष दिनदर्शिका अनावरण सोहळा उत्साहात संपन्न!







**वर्धा/चंद्रपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्या विदर्भ विभागातील वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यातील पत्रकारांनी संयुक्तपणे संपादित केलेल्या विशेष दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच उत्साहात पार पडले. पत्रकारांच्या एकजुटीचे आणि सर्जनशील कार्याचे प्रतीक ठरणाऱ्या या दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, विदर्भ अध्यक्ष अनुपकुमार भागरव तसेच संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर यांची प्रमुख उपस्थिती होती.

दिनदर्शिकेत वर्षभरातील महत्त्वाचे दिनविशेष, सामाजिक घडामोडी आणि पत्रकारितेशी संबंधित माहितीचा समावेश करण्यात आला आहे. पत्रकारांच्या सामूहिक प्रयत्नातून साकारलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी मान्यवरांनी पत्रकार संघटनात्मक एकात्मता अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रात पुन्हा स्वराज्य येईल

## शिवव्याख्यात्या सुनंदाताई टिळक भोस

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

प्रत्येक मातेने जिजाऊंसारखे आपल्या मुलांवर संस्कार करावेत. त्यासाठी मुलांना वेळ देणे आवश्यक आहे. आभासी नात्यांपेक्षा खऱ्या नात्यांना जपले पाहिजे. इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप आणि इंटरनेटपासून स्वतःला व मुलांना दूर ठेवले, तर दुसऱ्याच्या नव्हे तर आपल्या घरातच शिवबा जन्माला येईल आणि महाराष्ट्रात पुन्हा स्वराज्य येईल, असे प्रतिपादन शिवशंभू व्याख्यात्या सुनंदाताई टिळक भोस यांनी केले.

मढेवडगाव येथील जिल्हा परिषद उंडेमळा शाळेत मावळा प्रतिष्ठाण, मढेवडगाव व शंभूराजे युवा प्रतिष्ठाण उंडेमळा/शिंदेमळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवजयंती उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाइस चेअरमन व ज्येष्ठ संचालक सुभाषकाका शिंदे होते. यावेळी सुनंदाताईंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून महिलांना जागृत केले. अंधश्रद्धा बाळगू नका, दूरदृष्टी ठेवा आणि स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा, असे त्यांनी आवाहन केले.



कार्यक्रमास शिरसगावचे माजी सरपंच तेजमल धारकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर, माजी अध्यक्ष नवनाथ उंडे, ग्रामपंचायत सदस्या सोनालीताई उंडे, गोरखराजे उंडे, भगवानराव गायकवाड, प्रा. मनोहर उंडे, जगदेव उंडे, पांडुरंग उंडे, निळकंठ उंडे, दीपक पवार, अजय पवार, सचिन गिरे, सोमनाथ खराडे, प्रमोद वाबळे, नितीन शिंदे, महेश शिंदे, संजय शिंदे, माणिक मांडे, किशोर मांडे, मेजर नवनाथ शिंदे, राहुल शिंदे, भरत शिंदे, सिद्धेश मांडे, सोहम शिंदे, सुहास मिसाळ, योगराज उंडे, सूरज उंडे, गोरखराव मांडे, अनिल थोरात, अशोक बनकर, अभिजित कुताळ यांच्यासह सविता मांडे, सुवर्णा शिंदे, शुभांगी पवार, तृप्ती शिंदे, श्रद्धा गायकवाड, प्रियांका शिंदे, मंगल मांडे, मंदा मांडे, शशिकला शिंदे, रोहिणी उंडे, वैशाली शिंदे, संगिता शिंदे, चंदाकाकी उंडे, प्राजक्ता उंडे, राणीताई शिंदे, हौसाबाई उंडे, लंकाबाई उंडे, सुलोचना मांडे, रतन शिंदे, शीतल शिंदे, कमलबाई शिंदे, निशा उंडे, वच्छला शिंदे, सिमा उंडे, अलका ठाकरे, रत्नप्रभा ठाकरे, सुप्रिया उंडे, मंगल उंडे, अंजाबाई उंडे, सुमन उंडे, पल्लवी शिंदे, जनाबाई शिंदे, संदेशा मांडे, प्राजक्ता शिंदे, संगिता पाचपुते, संध्या शिंदे, सुवर्णा शिंदे, ज्योती शिंदे, अर्चना शिंदे, बेबीताई मांडे, वर्षा उंडे, भागूबाई थोरात, अरुणा उंडे, कल्पना उंडे आदी माता-पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष इंगावले यांनी केले. रामदास ठाकरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रास्ताविक नवनाथ उंडे यांनी केले, तर आभार गोरखराजे उंडे यांनी मानले. शंभूराजे प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी जयंतीचे उत्कृष्ट नियोजन केले.

# शिवजयंती साजरी; व्याख्यानाचे आयोजन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), विद्यार्थी कल्याण मंडळ आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने महाविद्यालयापासून ते महात्मा फुले चौकापर्यंत भव्य पदयात्रा काढण्यात आली. "छत्रपती शिवाजी महाराज की जय" अशा घोषणांनी श्रीगोंदा शहर दुमदुमून गेले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनी ऐश्वर्या रवींद्र शितोळे देशमुख हिने स्फूर्तिदायक पोवाडा सादर केला. रेणुका कांतीलाल शिंदे



आणि प्रांजल रंगनाथ दळवी या विद्यार्थिनींनी महाराजांच्या जीवनचरित्रावर भाषणे केली. प्रमुख वक्ते डॉ. राहुल गायकवाड यांनी शिवरायांचा राज्यकारभार आणि जीवनप्रवासावर प्रकाश टाकला, तर प्रा. अनिल ढवळे यांनी महाराजांच्या शौर्याच्या लढायांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी शिवरायांच्या मावळ्यांच्या निष्ठेचे उदाहरण देत, सध्याच्या पिढीच्या बदलत्या जीवनशैलीवर व नैतिक मूल्यांवर खंत व्यक्त केली. तरुण पिढीने शिवरायांचे विचार अंगीकारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आर. बी. कानडे यांनी केले, तर आभार राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. भाऊ बुलाखे यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, डॉ. किरण ढवळे, डॉ. हरिभाऊ वाघिरे, प्रा. देवेंद्र बहिरम, प्रा. आर. जे. फटे यांच्यासह सर्व प्राध्यापक, एनसीसी कॅडेट्स आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "ट्रायंगल" मराठीतील पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हिंदी किंवा दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आजवर अनेक स्पाय थ्रिलर चित्रपट झाले आहेत. मात्र, मराठी चित्रपटात असलेली स्पाय थ्रिलर चित्रपटांची उणीव आता भरून निघणार आहे. "ट्रायंगल" हा मराठी चित्रपटसृष्टीतला पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट ठरणार असून, अर्जून करे हा नवा चेहरा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. देशभक्ती, निष्ठा आणि धाडसाची अनोखी गोष्ट या निमित्ताने मराठी भाषेतून मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. वैष्णवी फिल्म्सची निर्मिती असलेल्या "ट्रायंगल" या चित्रपटाची निर्मिती विकी सूर्यवंशी आणि सुखदेव आढाव यांनी केली असून लेखन आणि दिग्दर्शन विकी सूर्यवंशी यांनी केलं आहे. राजकीय




■ "ट्रायंगल" चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

आणि गुप्तधार्मिक जगतातील गुंतागुंत या चित्रपटात मांडण्यात आली आहे. भारताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली इंडियन ओशन सिक्युरिटी सिस्टिम डॉक्युमेंट्स चोरी करण्याचा प्रयत्न परदेशी संस्था करतात आणि सुरू होतो एक आंतरराष्ट्रीय खेळ... वेगवान कथा, उत्कृष्ट अॅक्शन सिक्वेन्स हे चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. तांत्रिक बाजूंवरही हा चित्रपट खिळवून ठेवणारा आहे. "ट्रायंगल" चित्रपटात अर्जून करे, पूनम कापसे, आरती पुरी, ऋत्विक रास्ते, अलोक बसके, शरद लाडगे, भक्ती साधू अशी दमदार स्टारकास्ट या चित्रपटात आहे. कुणाल कांबळे हे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरचं कथानक मुंबई, गोव्यासह ठिकठिकाणी चित्रीत करण्यात आलं आहे.

एक मोठा पट या चित्रपटातून मांडण्यात आला आहे. त्यामुळे स्पाय थ्रिलर हा प्रकार आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी हा चित्रपट पर्वणी ठरणार आहे. त्याशिवाय उत्तम कथेमुळे प्रेक्षकांचं पुरेपूर मनोरंजन या चित्रपटात आहे.

# राज्यावर अवकाळीचं संकट!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये उकाडा वाढला असून उन्हाचे चटके लागू लागले आहे. राज्यातील तापमानात चढ-उतार पाहायला मिळत आहे. अशातच भारतीय हवामान विभागाने अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सर्वांसाठी महत्वाचे राहणार आहेत. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात सोमवारी आणि मंगळवारी ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ११ जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# मोबाईलचा अतिवापर व व्यसनांचे दुष्परिणाम याबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन

**ओतुर : (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरमध्ये मोबाईलच्या अतिवापरामुळे व विविध प्रकारच्या व्यसनांमुळे होणारे घातक दुष्परिणाम टाळण्यासाठी काय करावे व काय करू नये याबाबत सुमन व्यसनमुक्ती व मानसिक आजार उपचार केंद्र आळेफाटा चे ऋषी साबळे व आदित्य डोईजड यांचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

मोबाईलचा अतिवापर व व्यसनांचा दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती व्हावी यासाठी मार्गदर्शन करताना आदित्य डोईजड व ऋषी साबळे म्हणाले की ,मोबाईलचा अतिवापर व विविध व्यसने केल्यामुळे मेंदूवर व मनावर त्याचे वाईट



परिणाम होतात. मनोविकृती निर्माण होते. मोबाईल मुळे माणसे एकमेकांपासून दूर गेली आहेत.विद्यार्थी एकलकोंडे होत असून त्यांचा व्यक्तिमत्व विकास होत नाही.अफू ,गांजा ,फुलचंद पान, स्टिंग यासारखी शीतपेय आदींचे व्यसन विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच लागले आहे. आज-काल लहान मुलांना जेवायला घालताना सुद्धा त्यांच्या हातात मोबाईल द्यावा लागतो. याप्रकारे सवय लागते आणि या सवयींचे व्यसनांत रूपांतर होते आहे.याला बऱ्याचशा प्रमाणात पालकही जबाबदार आहेत. मोबाईल मुळे एकमेकांमधील संवाद कमी होत आहे.व्यसनांमुळे चिडचिड होणे , हृदयाचे विकार ,पोटात दुखणे , उलट्या होणे तसेच कॅन्सर सारखे महाभयंकर आजार होत आहे.विद्यार्थी अभ्यासापासून अभ्यासापासून दूर जात आहेत. वाचन संस्कृती बंद होत आहे. आपल्याला या सर्व संकटांपासून वाचायचे असेल तर वेळेनुसार व गरजेनुसार मोबाईलचा वापर करा. सोशल मीडियाचा वापर करू नका त्याऐवजी विविध मैदानी खेळ खेळा.आईवडिलांशी गप्पा मारा.विविध प्रकारच्या संस्कारक्षम पुस्तकांचे वाचन करा. स्वतःचे छंद जोपासण्यासाठी वेळ द्या.व्यसनांपासून दूर राहा व इतरांनाही दूर ठेवा.

याप्रसंगी ग्राम विकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे,पंकज घोलप ,राजश्री भालेकर ,संजय हिरे,अनिल उकिरडे, भाऊसाहेब खाडे, राजाराम शिंदे ,विजया गडगे, भगवंता घोडे, संतोष कांबळे , मिलिंद खेत्री,विशाल चौधरी,मंगेश तांबे , आशा गाडेकर, सोनाली माळवे,शिल्पा भालेराव,वनिता भोर,आसावरी गायकर ,सोनाली कांबळे ,लक्ष्मण दुडे , संतोष सोनवणे,बाळासाहेब साबळे , देवचंद नेहे,अनिल जवरे,रंजीता पाटील,सरस्वती भताने,रसिका शेळके , अश्विनी नलावडे,साक्षी देशमुख,निर्मला डोंगरे,योगेश फापाळे,ईश्वर ढमाले , अरविंद आंबरे,प्रसन्न तांबे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक अजित डांगे यांनी केले. आभार अमित झरेकर यांनी मानले.

# "संशोधन, नवोन्मेष व बौद्धिक संपदा हक्क" विषयावर कार्य शाळा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर,रसायनशास्त्र विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,विद्यार्थी विकास विभागा तर्फे "संशोधन,नवोन्मेष व बौद्धिक संपदा हक्क:विज्ञान व तंत्रज्ञानातील समन्वयात्मक दृष्टिकोन" या विषयावर दि:- १३ फेब्रुवारी २०२६ रोजी रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळे साठी संस्थेचे अध्यक्ष अॅड संजय शिवाजीराव काळे,अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. विलास कुलकर्णी व प्राचार्य डॉ महादेव वाघमारे यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानी डॉ बाबासाहेब माने होते. तसेच विद्यार्थी विकासअधिकारी प्रा. विक्रम रसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यशाळेचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.




ज्ञानेश्वर शिंदे प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय आकुर्डी पुणे यांनी "विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधन आणि नवोपक्रम" या विषयावर मार्गदर्शन केले.त्यांनी आधुनिक संशोधनातील संधी, नवकल्पनांचे महत्त्व आणि उद्योग-संस्थांमधील सहकार्य याविषयी सविस्तर माहिती दिली.डॉ.मन्सूर मौलवी यांनी "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रसायनशास्त्र साधने" या विषयावर सत्र घेतले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रसायन माहिती शास्त्रातील आधुनिक साधनांचा संशोधनात कसा उपयोग होतो याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात डॉ.संतोष शिंदे,हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज मंचर यांनी "संरक्षणाची शक्ती:आयपीआरची मूलतत्त्वे समजून घेणे" या विषयावर पेटंट, कॉपीराइट,ट्रेडमार्क आणि ट्रेड सिक्रेट्स यांची माहिती दिली. समारोप सत्रात डॉ.साधू कोळेकर अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर यांनी "मटेरियल सिंथेसिस आणि कॅरेक्टरायझेशन तंत्रे" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विविध विश्लेषण तंत्रांचीमाहिती विद्यार्थ्यांना दिली.या कार्यशाळे त जुन्नर व आंबेगाव तालुक्या ती ल महाविद्यालयामधील एकूण १०४ विद्यार्थ्यांनी व बहुसंख्य प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. सर्व सत्रे अत्यंत ज्ञान वर्धक व प्रेरणादायी ठरली. कार्यशाळेचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.संतोष काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.गीतांजली गाढवे तर आभार प्रदर्शन प्रा. ऋतुजा तांबोळी यांनी केले. प्रा. संदिप थोरवे यांनी समन्वयक म्हणून कार्य पाहिलेआयक्यूएसी समन्वयक डॉ.विनायक लोखंडे प्रा. विकास कदम,प्रा.अमोल दप्तरे आणि रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या संशोधन विषयक जाणीवा वृद्धिंगत करणारा व भविष्य कालीन शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा देणारा कार्यक्रम झाला.

# प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना पुरस्कार

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

युद्ध, विध्वंस आणि अस्थिरतेच्या सावटाखाली असलेल्या जागतिक परिस्थितीत शांततेचा समर्थ आवाज ठरलेल्या 'हाक शांततेसाठी' या पुस्तकाला राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा यशवंतराव चव्हाण वाङ्मयीन पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख कवी, लेखक, समीक्षक व अनुवादक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना बालवाङ्मय ना.धो. ताम्हणकर पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून दि २७ रोजी नाशिक येथे आयोजित केल्या जाणाऱ्या विश्व मराठी संमेलनात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. प्रा. डॉ. तौर यांच्या ३० हून अधिक साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत.

# शेतकरी संघटेना बुलंद आवाज हरपला

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील जुन्या पिढीतील राजकीय क्षेत्रातील पितृतुल्य व्यक्तिमत्व व शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते झुंबरराव गंगाधर आरोटे (वय 90, मूळ रा.मेहेंदुरी,हल्ली,~बस स्थानक परिसर, अकोले)यांचे गुरुवारी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले,सुना, भाऊ, पुतण्या,नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. शेतकरी संघटनेचा बिल्ला अखेर पर्यंत त्यांच्या शर्टवर कायम राहिला. राजकीय, सामाजिक जीवनातील एका पर्वाचा अस्त झाल्याची भावना सर्व क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

अकोले येथील अगस्ती सहकारी साखर कारखाना, अमृतसागर दुध संघ ते माजी संचालक होते.अकोले तालुका खरेदी विक्री संघांचे ते चेअरमन म्हणून त्यांनी काम पाहिले.



सुरुवातीला त्यांनी काही काळ काँग्रेस व समाजवादी पक्षात काम केले. त्यानंतर

शेतकरी संघटनेचे संस्थापक स्व.शरद जोशी यांचेशी 1980 पासून त्यांचे घनिष्ठ संबंध होते. राज्य कार्यकारिनी वर त्यांचे सोबत काम केले.अकोले तालुक्यातील विविध आंदोलने, चळवळी यांत त्यांचा हिरीरीने सहभाग होता. स्पष्ठवक्ते स्वभावाचे असणारे झुंबरराव आरोटे यांची स्मरणशक्ती शेवट पर्यंत तल्लख होती.ज्येष्ठ ते युवक तसेच नातेवाईक, मित्र परिवारात त्यांचा आदरयुक्त दरारा होता.तालुक्यातील अनेक कुटुंब यांचेशी त्यांचे कौटुंबिक संबंध होते.

अगस्ति कारखान्याचे ज्येष्ठ संचालक अशोकराव आरोटे, जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त अभियंता राजेंद्र आरोटे , अॅड.अनिल आरोटे ,उद्योजक साहेबराव आरोटे यांचे ते वडील होत. शेतकरी संघटनेचे नेते सुनिल रंगनाथ मालुंजकर, सेवा निवृत्त प्राचार्या पद्मा दामोदर वैद्य,बेबी दशरथ चासकर यांचे ते मामा होत.तर प्रगतीशील शेतकरी रामभाऊ आरोटे यांचे ते बंधू तर सुरेश आरोटे यांचे ते चुलते होत.

त्यांच्याव पार्थिवा वर शुक्रवारी सकाळी मेहेंदुरी (ता.अकोले) येथे प्रवरातिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवरांसह नातेवाईक, ग्रामस्थ, मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जामखेड येथे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या. पुणे. व जिल्हा उपनिबंधक सह. संस्था अ. नगर. यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. पत संस्था मधील अधिकारी व कर्मचारी यांना सहकार क्षेत्रात. कायदयात जे काही बदल झाले आहेत. ते कर्मचारी वर्गापर्यंत गेले पाहिजे. त्यांना समजून सांगने साठी प्रशिक्षण गरजेचे असते. तसेच कर्ज वसुली.. घ्यावयाची दक्षता. कायदेशीर तरतुदी काय आहेत. हे अधिकारी व कर्मचारी यांना माहिती होणे गरजेचे आहे. या साठी प्रशिक्षण आवश्यक आहे.. असि माहिती संबंधित अधिकारी यांनी दिले. एन पी ए. संकल्पना काय आहे. तो कसा काढायचा. या बाबत चर्चा करण्यात येणार आहे. या शिबिरात मधे विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. या मधे सर्वश्री. मा. मयुर शेळके.मा. पवन पाटील प्रशिक्षण समन्वयक.. मा.मंगेश सुरवसे. जिल्हा उपनिबंधक... मा. धनंजय डोईफोडे. सहनिबंधक. पुणे... मा. सोपान शिंदे. जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी.. मा. दिलीप तिजोरे. सहाय्यक निबंधक.. जामखेड.. मा. विजय बजाज. डे. मॅनेजर. संगमनेर... मा.. नारायण परजणे. सहाय्यक निबंधक. श्रीगोंदा.. ईत्यादी मान्यवर उपस्थित पत संस्था. अधिकारी व कर्मचारी यांना वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी १०/३० ला उदघाटन होणार आहे. सकाळी 11 वाजल्या पासून सायंकाळी ५/३० वाजेपर्यंत सदरचे शिबीर संपन्न होणार आहे. तालुक्यातील सर्व सह. संस्था मधील अधिकारी व कर्मचारी या मधे सहभाग घेणार आहेत.

# "शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट" - उपमुख्यमंत्री

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'शतक' चित्रपटासाठी दिल्या खास शुभेच्छा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी प्रेक्षकांना 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे. शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.एकंदरीतच या चित्रपटाबद्दल सांगताना ते म्हणाले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासावर आधारित शतक हा चित्रपट आपल्या भेटीला येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या गीताचे अनावरण डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते झाले, हे या कलाकृतीसाठी सर्वात मोठे पाऊल आणि आशीर्वाद आहे. यापुढे






ते म्हणाले की, "हा केवळ एक चित्रपट नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या स्थापनेपासून राष्ट्रभक्तीचे संस्कार आणि समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या हजारो स्वयंसेवकांचा त्याग, कष्ट आणि समर्पणाची ही जिवंत गाथा आहे. शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट येणाऱ्या पिढीसाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल, याची मला खात्री आहे. या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि संपूर्ण टीमचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांना शुभेच्छा देतो. हा चित्रपट घराघरांत आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात 'राष्ट्रप्रथम' हा भाव अधिक दृढ व्हावा, हीच सदिच्छा." 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट संघाचा विचारप्रवास, सामाजिक उपक्रम आणि देशसेवा यांचा आढावा घेतो. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरनंतर या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

# कॉँक्रीटीकरणात चिरा, पाणी पुरवठा अपुरा; दर्जा खालावला

- टाकळी ढोकेश्वर येथे महामार्गावर सुरू असलेले काम निकृष्ट
- राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव यांचा आंदोलनाचा इशारा




**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग वरील कॉँक्रीटीकरणाचे काम सध्या सुरू आहे. मात्र, हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे नेते निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी केला आहे. कामादरम्यान ट्रॅफिक नियंत्रणासाठी गार्ड किंवा सुरक्षा व्यवस्था नसणे, सूचना फलक नसणे यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. महामार्गावरील काळेवाडी येथे झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला. याला जबाबदार कोण, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात आला आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरात वासुंदे चौक व पारनेर चौक या भागात रस्त्याचे काम सुरू असतानाच रस्त्यावर चिरा पडलेले दिसत आहेत. कॉँक्रिट टाकल्यानंतर पुरेसे पाणी मारले जात नसल्याने दर्जा खालावत असल्याचा आरोप रविंद्र राजदेव यांनी केला आहे. टाकळी ढोकेश्वर ही पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील जवळपास ४० गावांची बाजारपेठ आहे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात परिसरातून ग्रामस्थ येत असतात काम सुरू असल्याने वासुंदे चौक व पारनेर चौकात त्यामुळे मोठ्या प्रमाणात ट्राफिक सुद्धा पहावयास मिळत आहे ग्रामस्थांची व प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता कामामध्ये वेग गरजेचा असून काम हे चांगल्या दर्जाचे सुद्धा होणे गरजेचे आहे. कामातील निकृष्टता ही धोकादायक असून असे राहिले तर भविष्यात रस्ता लवकर खराब होईल. असे मत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. तसेच, या महामार्गासाठी ज्यांच्या शेतजमिनी गेल्या आहेत, त्यांना नुकसान भरपाई देण्याचे खासदार निलेश लंके यांनी अधिकाऱ्यांना सांगून दोन महिने उलटले तरी प्रशासनाने अद्याप भरपाई दिलेली नाही. रविंद्र राजदेव यांनी स्पष्ट केले की, येत्या दोन दिवसांत कामातील या सर्व त्रुटी दूर करून दर्जा सुधारला नाही, तर निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. यावेळी टाकळी ढोकेश्वर उपसरपंच रामभाऊ तराळ, महेश झावरे, संपत तराळ, बाळशीराम पायमोडे, संजय खिलारी (मेजर), मळीभाऊ रांधवन, अशोक पायमोडे, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे, कृष्णा बांडे, विकास आल्हाट आदी उपस्थित होते.



ठाणे : दिव्यातील जाणता राजा मित्र मंडळ आयोजित १० वा शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. प्रसंगी अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले. अध्यक्ष समीर चव्हाण यांच्यासह उदय सावंत, प्रशांत चव्हाण , राजेंद्र आंब्रे , सुशांत अर्धापूरे, अभिजीत सुर्वे , विग्नेश सुर्वे, रोहन सावंत , प्रतीक विचारे ,महेंद्र आंब्रे , प्रियेश जाधव , यश गोडा , सिद्धेश कुडतरकर , मॉन्टी कुडतरकर , ऋषिकेश लोके, आदित्य लोके,मुकेश परमार, बाबू सुर्वे , अरविंद ढेकळे, विकी कदम, अजय जाधव, दिनेश सावंत, चिंतन ढेकळे, निशांत गौडा, तेजस शिंदे, अतिश साळगावकर, राकेश बेलेल यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### शंभर टक्के दिव्यांगत्व असलेल्या स्वरा हीसमिळाली व्हील चेयर

देवळाली प्रवरा (स. गांवकरी) : येथील पीएमश्री जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा देवळाली प्रवरा येथील इयत्ता चौथी शिकत असलेल्या शंभर टक्के दिव्यांगत्व असलेल्या कुमारी.सोरा सुनील खांदे हिला अनुदान मधून व्हील चेयर देण्यात आली. या प्रसंगी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष जालिंदर मुसमाडे , उपाध्यक्ष सौ . पुष्पा बोरकर , सुप्रसिद्ध व्यापारी नरेंद्र शेठ मुथा तसेच पत्रकार संजय हुडे, सदस्य सतीश जाधव.सौ वैशाली काळे. बशीर सय्यद.मुख्याध्यापिका सौ.नंदा थोरात मॅडम, .शिक्षिका सौ.मनीषा शिंदे. सौ.अयोध्या कुडके. जोति म्हसकुले. अर्चना माळी. सीमा ढाळे. प्रतीक्षा बोबे. सुप्रिया आंबेकर.मुलीचे आई व वडील नातेवाईक उपस्थित होते.

### सहा वर्षांच्या चिमुकल्याने रमजानचा रोजा पूर्ण केला



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : पवित्र रमजान महिन्याच्या पहिल्याच दिवशी श्रीगोंदा तालुक्यातील कोरेगाव येथील अर्शद निसार सय्यद या अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकल्याने श्रद्धा आणि जिद्दीच्या बळावर आपला पहिला रमजान रोजा पूर्ण करत पंचक्रोशीतील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. विविध स्तरांतून त्याचे कौतुक करण्यात येत आहे. कोरेगाव येथील सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात सदैव सक्रिय असलेले ज्येष्ठ व्यक्तिमत्व महेबुब हुसेनभाई सय्यद यांचा नातू असलेल्या अर्शदने अत्यंत लहान वयात निर्जळी उपवास (रोजा) पूर्ण केला. पहाटे लवकर उठून 'सेहरी' करून त्याने उपवासास सुरुवात केली. दिवसभर कडक उन्हात तहान-भूक सहन करत त्याने चिकाटीने रोजा पाळला. संध्याकाळी 'इफ्तार'च्या वेळी कुटुंबियांसोबत त्याने आपला आयुष्यातील पहिला रोजा सोडला. या वयात दाखवलेली शिस्त, संयम आणि भक्तीभाव पाहून परिसरात त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अर्शदने स्वतःच्या इच्छेने हा रोजा ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे कुटुंबियांनी सांगितले. त्याच्या या प्रयत्नाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक तसेच परिसरातील नागरिकांनी अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



### छ. शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी; समानतेचा एकतेचा संदेश

पारनेर (स. गांवकरी) : छत्रपती शिवाजी महाराज यांची३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. पारनेर राहुल नगर महिला मंडळ लोणी हवेली रोड येथे सर्व महिलांनी एकत्र येत शिवजयंती चे नियोजन केले. शिवरायांनी दिलेला एकतेचा आणि समतेचा विचार जपणे काळाची गरज आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सांस्कृतिक विचाराची जोपासना सर्वच करत आहे. याप्रसंगी राहुल नगर लोणी रोड महिला मंडळ. वंदना दिवेकर, प्रभाती मोरे, कीर्ती पवार, विद्या जगदाळे, मनीषा गायकवाड, स्वाती तडके, नंदा सोनावणे, संगीता जाधव, आरुषीला जाधव, मुन्नादेवी भाटी, बेबी जगताप,वर्षा बोरुडे,सुरेखा शिंदे, सूत्रसंचालन व प्रस्तावित भारतीय बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष संपत पवार सर यांनी केले उपस्थित मान्यवर, आर पी आय तालुकाअध्यक्ष किरण सोनवणे (आंबेडकर गट) सचिन नागरे,रमेश गायकवाड,कांतीलाल दिवेकर,या मान्यवरांनी विचार व्यक्त केले, व आभार प्रथमेश मोरे यांनी मानले.

### दहावीच्या बोर्ड परीक्षेला सुरुवात

पारनेर (स. गांवकरी) : श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे दहावी (SSC) बोर्ड परीक्षा सुरळीत सुरू या केंद्रात एकूण ४८६ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. २० ब्लॉक (कक्ष/हॉल) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ३२ शिक्षक निरीक्षक म्हणून नियुक्त आहेत. केंद्रप्रमुख: श्रीमती मनीषा आबासाहेब गाडगे त्यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीत सुरू झाली आहे. आज या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांची तपासणी करून वर्गात सोडण्यात आले. कॉपी/अनुचित प्रकार टाळण्यासाठी पूर्ण प्रयत्न; केंद्रप्रमुखांनी कॉपीमुक्त वातावरणाचा विश्वास व्यक्त केला आहे.

# अंधेरी येथे श्रीमद् भागवत कथा सत्संग महोत्सव उत्साहात

## नानजीभाई ठक्कर यांचा सन्मान!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अंधेरी येथील महात्मा फुले मैदानावर श्रीमद् भागवत कथा सत्संग महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले. हजारो भक्तांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात हा सोहळा यशस्वीपणे पार पडला.

यावेळी समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांच्या हस्ते गोवर्धन पर्वत पूजन व श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला इस्कॉन मंदिर, जुहू चे अध्यक्ष श्री रघुबीरदासजी प्रभुजी यांचे सानिध्य लाभले. तसेच श्री श्री 1008 पीठाधीश्वर संत श्री फलाहारी महाराज (गातोड गाव, सेमारी), श्री विठ्ठल बंदेरी, संस्थापक श्रीमती प्रविणाबेन हितेंद्र ठाकूर, श्री दीपक कोठेकर, श्री रुपेश सावरकर, श्री भरतसिंह राजपुरोहित, श्री जीवनजी संघवी, श्री भवरलालजी जोशी, उपाध्याय श्री चंद्रशेखरजी पालीवाल, श्री पूर्णशंकर जोशी, श्री गोपाल जोशी, श्री दुर्गेश मेहता, श्री बलुराम, श्री नरेश जोशी, श्री दिनेश मेहता, श्री जगदीशजी, श्री संजीव मिश्रा, श्री भवन शास्त्री, सुशीलकुमार मेहता, श्री आकाश राजपुरोहित डागी, श्री नीलेश व्यास, मेवाड एकता फाऊंडेशन यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भाषणात नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "श्रीमद् भागवत कथा आपल्याला शांती, भक्ती आणि आध्यात्मिक ज्ञानाचा मार्ग दाखवते. श्रीकृष्णांच्या



जीवनकथांमधून धर्म, संयम आणि सत्य यांचे महत्त्व स्पष्ट होते. आदर्श जीवन जगणे आणि दयाळू अंतःकरणाने समाजसेवा करणे हेच भागवत प्रवचनांचे मुख्य उद्दिष्ट आहे." यावेळी त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची माहिती देताना सांगितले की, जात, भाषा किंवा धर्म कोणताही असो, गरजू व्यक्तींना ऑपरेशन, बायपास, अँजिओग्राफी, मूत्रपिंड प्रत्यारोपण यांसारख्या वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. रुग्ण व त्यांच्या सोबत्यांच्या राहण्याची व जेवणाचीही व्यवस्था केली जाते. "जिथे चांगले काम होते, तिथे मदतीचा हात पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे," असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात श्री रघुबीरदासजी प्रभुजी यांनी नानजीभाई ठक्कर यांचा पगडी, हार व शाल देऊन सत्कार केला. या महोत्सवाचे संचालन इस्कॉन मंदिरात सेवा देणाऱ्या श्रीमती तारा महेश शर्मा यांनी उत्कृष्टरीत्या केले.

भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या महोत्सवामुळे अंधेरी परिसरात आध्यात्मिकतेची नवचैतन्य निर्माण झाले असून उपस्थित भक्तांनी समाधान व्यक्त केले.

# पतसंस्थेने अनधिकृत रित्या जामीनदारांचे खाते गोठवले

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील माळकुप येथील योगिता पोपट खांडके यांच्या बचत गटाने गोरेश्वर पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. थकबाकीमुळे गोरेश्वर पतसंस्थेने थकीत कर्जदार व जामीनदार यांच्यावर १०१ कारवाई सुरू केली. जामीनदारांच्या जमिनींवर बोजा चढवला गेला, म्हणजे जमीन जप्तीची प्रक्रिया सुरू झाली. पण तरीही पतसंस्थेने जामीनदारांच्या बँक खात्यांमध्ये अनधिकृतपणे गोठवणी केली. जमीन जप्त असताना लिलाव का नाही केला? आणि खाते गोठवण्याचा अधिकार पतसंस्थेला असतो का? असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला.

या कारवाईमुळे कर्जदार आणि जामीनदार आक्रमक झाले. त्यांनी सहाय्यक निबंधक कार्यालय, पारनेर येथे धाव घेतली. सहाय्यक निबंधक श्री विकास जाधव साहेब रजेवर असल्याने सहकार अधिकारी श्रेणी-१ राजेंद्र वाघमोडे यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या कार्यालयाकडून खाते गोठवण्याचे कोणतेही आदेश दिलेले नाहीत. ही कारवाई पतसंस्थेने स्वतः केली असावी. यावर महिलांनी बाचाबाची केली आणि अर्ज दाखल केला की, दोषींवर कडक कारवाई व्हावी. अन्यथा सोमवारी सर्व महिला आत्मदहन करतील आणि जबाबदारी निबंधक कार्यालयाची राहील, असे नमूद केले.

कायदेशीर दृष्ट्या, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात जमीन जप्तीला कलम १०१ अंतर्गत प्रक्रिया आहे. लिलावाआधी खाते गोठवणे हे स्वतंत्र परवानगीशिवाय बेकायदेशीर ठरू शकते.

# एस एस सी बोर्ड परीक्षा सुरळीतपणे सुरू



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

हनुमान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टाकळी खातगाव शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षा सुरळीतपणे व कॉफी मुक्त वातावरणामध्ये सुरू झाले असून आज विद्यालयाच्या वतीने परीक्षेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचबरोबर कॉपीमुक्त वातावरणामध्ये परीक्षा होतील याची खबरदारी घेण्यात येणार आहे या परीक्षेसाठी हनुमान शैक्षणिक संकुलना मध्ये एकूण 206 विद्यार्थी परीक्षेत सामोरे जाणार आहे या परीक्षेसाठी शुभेच्छा देताना केंद्राचे केंद्र संचालक श्री खिलारी बाळासाहेब सर तसेच प्राचार्य श्री बाक्षे दिलीप सर श्री अडसूळ सर श्री शेख सर श्री वर्पे सर श्री आहेर सर उपप्राचार्य श्री वैराळ सर व सर्व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या. शाळेची भौतिक सुविधा पाहता या शाळेमध्ये सर्व वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहे त्याचबरोबर गुगल मीट द्वारे प्रक्षेपणही करण्यात येणार असून ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणामध्ये पार पडणार आहे असे केंद्र संचालक श्री खिलारी सर यांनी आश्वासन दिले आहे.

# श्रीगोंदा शहरात शिवजयंती विविध उपक्रमांनी साजरी

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. जोधपूर मारुती चौक, शनी चौक तसेच छत्रपती शिवाजी महाराज बाह्य वळण परिसरात विविध संस्थांच्या पुढाकारातून अनेक उपक्रम राबविण्यात आले.



जोधपूर मारुती चौक येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने वेषभूषा स्पर्धा, गायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मॅरेथॉन तसेच विद्यार्थ्यांचे ऐतिहासिक सादरीकरण आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांसह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद कापसे, शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा मीरा खेंडके, उपाध्यक्ष चेतना मांडगे, नाना शिंदे, दीपक मखरे, राजेंद्र राऊत, गोरख पारे, शाम जरे, गोरख घोडके, दिलीप लबडे, सुनील ढवळे, बालू मखरे आदींनी परिश्रम घेतले.

शनी चौक येथे सावित्री–फातिमा सद्भावना विचारमंच व शनी चौक मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने जयंती साजरी करण्यात आली. आयोजक बापू माने, अॅड. संभाजीराव बोरुडे व मित्रपरिवाराच्या उपस्थितीत सकाळी महाराजांना अभिवादन करण्यात आले, तर सायंकाळी प्रा. सुभाष वारे यांचे व्याख्यान झाले.

छत्रपती शिवाजी महाराज बाह्य वळण परिसरात आरंभ युवा प्रतिष्ठान व मखरेवाडी मित्र मंडळाच्या वतीने आकर्षक सजावट करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंतीदिनी माजी मंत्री बबनराव पाचपुते, डॉ. प्रतिभाताई पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, दिग्विजय नागवडे, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, तहसीलदार सचिन डोंगरे, उपनगराध्यक्षा अलका अनुभुले, नगरसेविका मीरा शिंदे, सीमा गोरे, पत्रकार गायत्री ढवळे, संतोष इथापे, मुकुंद सोनटक्के, नगरसेवक अमीन शेख, अनिता औटी, अख्तर शेख, अनिल औटी, बाबुशेठ धुमाळ, सुशील शिंदे, पांडुरंग पोटे, सोनू कोथिंबीरे, संजय खेतमाळीस, राजेंद्र उकांडे, नंदकुमार ताडे, आप्पासाहेब सोनवणे, धनराज कोथंबीरे, उमेश बोरुडे, शिवा घोडके, दादासाहेब औटी आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

सर्व कार्यक्रम शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडले. या उत्सवातून ऐतिहासिक वारशाबद्दलचा अभिमान, सामाजिक ऐक्य आणि युवकांमधील प्रेरणादायी भावना प्रकर्षाने जाणवली.

# जय मल्हार विद्याप्रसारक मंडळाच्या शाळेच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन

## उदार दाते नानजीभाई ठक्कर यांचा गौरव!

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील पिंपळेश्वर येथे जय मल्हार विद्याप्रसारक मंडळाच्या शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तिचे उद्‌घाटन उदार दाते नानजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. या भव्य इमारतीसाठी उदार देणगी दिल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची विशेष भेट घेऊन मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

अवघ्या एका वर्षात उभी राहिलेली ही तीन मजली भव्य इमारत सुमारे एक एकर परिसरात विस्तारलेली असून विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, प्रशस्त वर्गखोल्या व आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परिसरात पूर्वी शाळेची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दूर जावे लागत होते. त्यामुळे या शाळेची उभारणी ही स्थानिकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. शाळेसोबतच प्रशस्त मैदान आणि दोन स्वतंत्र इमारतीही तयार करण्यात आल्या आहेत.

या नव्या इमारतीला उदार दाते नानजीभाई ठक्कर यांचे नाव देण्यात आले आहे. "शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही; शिक्षण असेल तरच समाज



सुधारेल," हा त्यांचा संदेश या उपक्रमातून प्रत्यक्षात साकार झाला आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळाली असून गावाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाला नवी दिशा मिळाली आहे. कार्यक्रमावेळी संस्थेचे सदस्य, शिक्षकवृंद, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी दात्यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी "व्यसनमुक्त समाजाचा निर्माण करा" हा महत्त्वाचा संदेशही देण्यात आला. काही ठिकाणी कीर्तन, खंडोबा मंदिरे यांसाठी अनेक इमारती उभारल्या जातात; मात्र समाजाच्या खऱ्या उन्नतीसाठी शिक्षणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. "मंदिर बांधा, पण त्यासोबत शाळाही बांधा" हा विचार समाजाने स्वीकारल्यास पुढील पिढी सुशिक्षित, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक म्हणून घडेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

तसेच करजुले येथे आयोजित पुरस्कार समारंभाबाबतही महत्त्वाची सूचना करण्यात आली. आतापर्यंत अनेक वेळा पुरुषांचा सन्मान झाला असला तरी यावर्षी विशेषतः विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना पुरस्कार देण्यात यावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

शिक्षिका, अधिकारी, तसेच कलेक्टर पदावर कार्यरत असलेल्या महिलांसह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

महिलांच्या कार्याचा सन्मान केल्यास समाजात सकारात्मक संदेश जाईल व स्त्रीशक्तीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# ‘इंटिग्रेटेड इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स’ची सुरुवात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील पहिले १००% एफडीआय-निधीत तृतीयस्तरीय आरोग्यसेवा रुग्णालय असलेल्या सकरा वर्ल्ड हॉस्पिटलने आपल्या अत्याधुनिक आणि एकात्मिक ‘इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स’चे उद्‌घाटन केले. अचूकता-आधारित, तंत्रज्ञान-सक्षम आणि रुग्ण-केंद्रित कॅन्सर व हिमॅटोलॉजी उपचार एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या विशेष केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.



नवीन संस्थेमध्ये मेडिकल ऑन्कोलॉजी, सर्जिकल ऑन्कोलॉजी, ब्रेस्ट ऑन्कोलॉजी, हिमॅटोलॉजी, अॅनेस्थेसियोलॉजी, क्रिटिकल केअर तसेच प्रगत शस्त्रक्रिया तज्ज्ञता यांसह संपूर्ण ऑन्कोलॉजी सेवा उपलब्ध असतील. आधुनिक निदान सुविधा आणि मल्टिडिसिप्लिनरी ट्यूमर बोर्ड्स यांच्या सहकार्याने या सेवा पुरवल्या जातील. या एकात्मिक मॉडेलमुळे समन्वित निर्णयप्रक्रिया आणि प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार वैयक्तिकृत उपचार योजना निश्चित होईल. ही पुढाकार सकरा वर्ल्ड हॉस्पिटलच्या लवकर निदान, अचूक उपचार आणि सर्वांगीण काळजीद्वारे कॅन्सर उपचार परिणाम सुधारण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. डॉ. विनीत गुप्ता, संचालक व प्रमुख – इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल म्हणाले, “वैद्यकीय संशोधन आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आज अनेक प्रकारचे कॅन्सर लवकर ओळखल्यास प्रभावीपणे उपचार करता येतात. भारतात दरवर्षी १४ लाखांहून अधिक नवीन कॅन्सर रुग्ण नोंदवले जातात; मात्र जागरूकतेचा अभाव आणि उशिरा निदान यामुळे अनेक रुग्ण प्रगत अवस्थेत उपचारासाठी येतात. वेळेवर निदान, शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा यामुळे परिणामांमध्ये लक्षणीय बदल घडवता येतो.”

हे संस्थान अवयव-विशिष्ट ऑन्कोलॉजी, मिनिमली इन्व्हेसिव्ह व रोबोटिक शस्त्रक्रिया, केमोथेरपी, सपोर्टिव्ह व पॅलिएटिव्ह केअर तसेच दीर्घकालीन सर्व्हायव्हरशिप कार्यक्रमांवर विशेष भर देणार आहे. निदानापासून बरे होण्यापर्यंत आणि त्यानंतरही सातत्यपूर्ण सेवा सुनिश्चित केली जाईल. याशिवाय, लवकर निदानाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिबंधात्मक ऑन्कोलॉजी, रुग्ण शिक्षण आणि जनजागृती उपक्रम राबवले जातील.

सकरा वर्ल्ड हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक श्री युइची नागानो म्हणाले, “इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्सची स्थापना सकराच्या जपानी अचूकता, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि क्लिनिकल उत्कृष्टतेच्या माध्यमातून भारतात जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या ध्येयाला अधिक बळकटी देते.”

# अकोले तालुक्यात क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठानची वार्षिक बैठक संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य (K A ग्रुप) या सामाजिक संघटनेची अकोले तालुक्यातील वार्षिक आढावा बैठक उत्साहात पार पडली. संघटनेचे राज्य नेतृत्व संदीप भाऊ गवारी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुक्यात संघटनेचे कार्य सुरू असून गेल्या वर्षभरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. मागील एक वर्ष अकोले तालुक्याचे अध्यक्ष म्हणून अरुण गोंदके यांनी कार्यभार सांभाळला. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने ग्रामस्तरावर जनजागृती, युवक संघटन, शैक्षणिक मार्गदर्शन आणि सामाजिक प्रश्नांवर पाठपुरावा असे विविध उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केले. संघटनेच्या नियमांनुसार दरवर्षी पदाधिकाऱ्यांची फेरनिवड करण्यात येते. त्यानुसार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत पुढील एक वर्षासाठी नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड जाहीर करण्यात आली. सर्वानुमते राहुल वळे राहणार फोपसंडी यांची अकोले तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून वैभव गोंदके राहणार करंडी यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. नवीन पदाधिकाऱ्यांनी संघटनेचे कार्य अधिक व्यापक स्तरावर नेण्याचा निर्धार व्यक्त केला. आदिवासी व बहुजन समाजाच्या हक्कांसाठी, युवकांच्या सबलीकरणासाठी आणि सामाजिक प्रश्नांच्या प्रभावी मांडणीसाठी संघटना अधिक जोमाने काम करेल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला. यावेळी अरुण गोंदके,तुषार साबळे, अॅड.रविंद्र सावळे,सुनील कोकतरे,वैभव गोंदके,अनमोल भांगरे,संतोष चौरे,विशाल गोंदके, महेश गवारी, रोहिदास मुठे, विजय पिचड,ओंकार वळे,अक्षय भोजने , ललित हिले, ज्ञानेश्वर गोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.





# काथ्या उद्योगांचे नागरिकांनी गिरवले धडे

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

कॉयर बोर्ड, भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत प्रादेशिक कार्यालय कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्र विद्यालय खानिवली, तालुका भिवंडी येथे काथ्या (कॉयर) उद्योग जनजागृती विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यशाळेदरम्यान कॉयर बोर्ड कणकवलीचे प्रादेशिक अधिकारी श्रीनिवास बीटलींगु यांनी काथ्या उद्योगाचे विविध उपयोग, उत्पादन प्रक्रिया आणि उद्योगाच्या व्यावसायिक संधींबाबत सविस्तर माहिती दिली. काथ्यापासून तयार होणाऱ्या दोरखंड, चटई, गादी, सजावटी वस्तू आणि शेतीसाठी उपयुक्त साहित्य यांसारख्या विविध उत्पादनांची माहिती देत हा उद्योग कमी गुंतवणुकीत सुरू करता येतो, असे त्यांनी सांगितले. तसेच हा उद्योग सुरू करण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना उपलब्ध असून, त्या योजनांसाठी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि आर्थिक सहाय्य मिळविण्याच्या पद्धतीबाबतही त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांनी स्वावलंबी बनून रोजगार निर्मिती करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य मिलिंद घरत यांनी काथ्या उद्योग हा पर्यावरणपूरक असून ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या उत्तम संधी निर्माण करणारा उद्योग आहे, असे सांगितले. शाश्वत विकासाच्या दृष्टीने अशा उद्योगांना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यशाळेला उपप्राचार्य जितेंद्र खरे, खानिवली ग्रामपंचायतीचे पंचायत अधिकारी हेमंत वेखंडे, सरपंच निकिता दळवी, सुषमा साखरे, स्वामी यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेमुळे उपस्थितांना काथ्या उद्योगाबाबत नवीन माहिती मिळाली असून, ग्रामीण भागात उद्योग उभारणीसाठी प्रेरणा मिळाल्याची भावना सहभागींकडून व्यक्त करण्यात आली.




# तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन

**तामसा: (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील उमरी (जा) येथे दि २२ फेब्रुवारी रोजी रविवारी तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून सदर धम्म परिषदेस जास्तीत जास्त समाज बांधवांनी शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहण्याचे आव्हान एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे आयोजन कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे . सदर कार्यक्रमात सकाळच्या सत्रात पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण व तसेच पूज्य भिकुनी रूपानंदा . ( श्रीलंका ) यांची धम्मदेश न होणार तर कार्यक्रमाचे अध्यक्ष हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ बाबूराव कदम कोहळीकर हे राहणार असून कार्यक्रमाचे उद्घाटक पूनम पाईकराव स्वागत अध्यक्ष बालाजी कदम हे असतील. या कार्यक्रमाचे संचलन हेमंत नरवाडे हे करणार असून जास्तीत जास्त समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले .

# ठाणे महापालिकेस ‘माझी वसुंधरा अभियान ५.०’ अंतर्गत प्राप्त पुरस्कार प्रदान

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरण बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या ‘माझी वसुंधरा अभियान 5.0’ (कालावधी 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025) अंतर्गत अमृत गटात 10 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या गटामध्ये ठाणे महानगरपालिकेस तिसरा क्रमांक प्राप्त झाला. हा पुरस्कार आज ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर व महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महामहिम राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, विधानसभा अध्यक्ष अॅड राहूल नार्वेकर आदी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.




या पुरस्काराचे वितरण डोम, सरदार वल्लभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे झाले. या पुरस्कार सोहळ्यास ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपआयुक्त मधुकर बोडके, सहाय्यक आयुक्त राजेंद्र सोनवणे, सोनल काळे, राहुल दुर्गुडे, प्रदूषण विभागाच्या वैशाली पालकर, ओम परळकर, भारत बिलसोर आदी उपस्थित होते. 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीत ठाणे महापालिकेने भुमी घटकांतर्गत 81,734 झाडांची लागवड, 99 नवीन हरित क्षेत्रांची निर्मिती, 729 हेरिटेज वृक्षांची नोंद व सर्वेक्षण, तसेच कचरा व्यवस्थापन व प्लास्टिक बंदी मोहिम प्रभावीपणे राबविली.

जैववैद्यकीय, ई-कचरा व C&D कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात संकलन व पुनर्चक्रिकरण करण्यात आले. वायू घटकांतर्गत हवेच्या गुणवत्तेचे पाच ठिकाणी नियमित निरीक्षण, हरित फटाक्यांबाबत जनजागृती, बांधकामांवरील प्रदूषण नियंत्रण उपाययोजना तसेच Heat Resilience व Flood Action Plan तयार करण्यात आला. जल संवर्धनांतर्गत रेन वॉटर हार्वेस्टिंग, मलजल प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता, विहिरींचे पुनरुज्जीवन आणि तलाव संवर्धनासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. अग्नी घटकांतर्गत एलईडी पथदिवे, ई-बस सेवा, ईव्ही चार्जिंग स्टेशन, सोलार रूफटॉप आणि सोलार वॉटर हिटर यांसारख्या ऊर्जा बचत उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.

आकाश घटकांतर्गत नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर ई-प्रतिज्ञा घेतल्या असून शेकडो जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांच्या आधारे ठाणे महानगरपालिकेने पर्यावरण संरक्षणात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला.

# नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली राहुल गांधी यांना जोडे मारो आंदोलन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राहुल गांधी हायहाय, या पप्पूचे करायचे काय ? - खाली डोके वर पाय, राहुल गांधी मुर्दाबादच्या घोषणांनी आज टेंभी नाका दुमदुमला. दिल्ली येथे सुरु असलेल्या एआय समिट दरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेले चड्डी बनियान आंदोलन, राहूल गांधी वारंवार करत असलेली देशविरोधी विधाने, संसदेचे कामकाज चालू न देणे, देशाच्या प्रगतीच्या आड येणे या सर्व गोष्टींचा निषेध आज टेंभी नाका येथील आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करुन केला.




या आंदोलनावेळी खासदार नरेश म्हस्के यांच्या समवेत शिवसेनेचे सचिव व नगरसेवक राम रेपाळे, शहर प्रमुख हेमंत पवार, युवा सेनेचे प्रवक्ते राहुल लोंढे, नगरसेवक सुधीर कोकाटे, प्रकाश पायरे, कमलेश चव्हाण, प्रशांत पाटील, रमाकांत पाटील, अमित जयस्वाल, दिपक म्हस्के, दिनेश मलपे, राजेश तावडे, संतोष बोडके, दत्ता फासले, वंदना डोंगरे, पूजा लोंढे तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवासैनिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपला भारत देश आज प्रगतीच्या वाटेवर आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांत आपण उल्लेखनीय प्रगती केली आहे. संपूर्ण जग आज भारताकडे एक प्रेरणा म्हणून बघत आहे. पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखाली विकासाला गती देणारे अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम आणि प्रकल्प देशभर राबवले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर काल दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या एआय समिटमध्ये तब्बल १८० देशांतील प्रतिनिधी, जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज आणि उद्योगविश्वातील मान्यवर उपस्थित होते. याठिकाणी भारताच्या तांत्रिक प्रगतीचं दर्शन घडत असताना, काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी शर्ट काढून भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात निदर्शने केली, तसेच पंतप्रधानांच्या विरोधात घोषणाबाजी करत काही काळ तणावाचं वातावरण निर्माण केलं. देशाच्या सन्मानाला आणि अशा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांच्या गांभीर्याला धक्का पोहोचवणारी ही कृती निश्चितच खेदजनक असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

# किरकोळ कारणावरून तरुणांचा खून

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर येथील तरूण व्यंकटी चांदू वाघमारे (वय २५वर्ष) राहणार प्रज्ञा बौद्ध विहाराच्या बाजूला अर्धापूर असुन मयत तरुण व आरोपी यांच्यात किरकोळ वादातून भांडण झाले,यात व्यंकटी वाघमारे या तरुणांच्या गुप्त अंगाला मार लागल्याने तो बेशुद्ध झाला होता.उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. या प्रकरणी

पोलिसांनी वेळीच समय सूचकता दाखवत ४ जणांना चौकशी साठी ताब्यात घेतले असून या प्रकरणी फिर्याद देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम,सपोनि विष्णुपंत कराळे, ठाणे अंमलदार जमदाडे पोलीस कर्मचारी गौतम कांबळे, इंदू गवळी यांनी मदत केली.

# “डॉक्टर ते स्पेशालिस्ट–यशाचा नवा अध्याय” : आ. काशिनाथ दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ गोरेगाव ता. पारनेर येथील माजी प्राचार्य शंकरराव नरसाळे यांचे नातू तसेच डॉ.अतुल व डॉ. शिल्पा नरसाळे यांचे चिरंजीव डॉ. आशुतोष नरसाळे यांची गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून एमबीबीएस पदवी संपादन केल्यानंतर नागपूर येथील एन.पी.के. साळवे मेडिकल कॉलेजमध्ये एमडी (सायकेट्री) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी नरसाळे कुटुंबाला भेट देऊन डॉ. आशुतोष यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सौ. सुमन दाते, मा. जि.प. सदस्य वसंतराव चेडे, विश्वनाथ चौधरी, सोनाबाई चौधरी, संगिता चेडे, विजय पिंपरकर, वैशाली पिंपरकर, शहाजी बेलोटे, नंदिनी बेलोटे, आप्पा अडसूळ, वैजयंती अडसूळ, डॉ. शरद ढुमे, डॉ. शाम बेलोटे, राजू चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार दाते सरांनी यावेळी बोलताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात यश संपादन करणे ही संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब आहे. वैद्यकीय क्षेत्रासारख्या जबाबदारीच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवून समाजसेवेची वाट निवडणे हे अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणाच्या बळावरच समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी डॉ. आशुतोष यांना रुग्णसेवेच्या कार्यात संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला. सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वसामान्यांच्या आयुष्यातील आनंददायी क्षणांमध्ये सहभागी होणे ही आपली कर्तव्यभावना असल्याचे सांगत आ. दाते सरांनी नरसाळे कुटुंबीयांच्या आनंदात मनापासून सहभाग नोंदविला.



डॉ. आशुतोष नरसाळेंचे शैक्षणिक यश

# २३ फेब्रुवारी रोजी पतसंस्था अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथे दि. २३ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील पतसंस्थांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या. पुणे व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अ.नगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. सहकार क्षेत्रातील कायदे व नियमांमध्ये वेळोवेळी होत असलेल्या बदलांची माहिती अधिकारी व कर्मचारी वर्गापर्यंत पोहोचावी, तसेच त्यांना अद्ययावत ज्ञान मिळावे, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः कर्जवसुली करताना घ्यावयाची दक्षता, कायदेशीर तरतुदी, तसेच एनपीए (NPA) संकल्पना व त्याची गणना कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या शिबिरात विविध मान्यवर मार्गदर्शन करणार असून त्यामध्ये मा. मयुर शेळके, मा. पवन पाटील (प्रशिक्षण समन्वयक), मा. मंगेश सुरवसे (जिल्हा उपनिबंधक), मा. धनंजय डोईफोडे (सहनिबंधक, पुणे), मा. सोपान शिंदे (जिल्हा उपनिबंधक, रत्नागिरी), मा. दिलीप तिजोरे (सहाय्यक निबंधक, जामखेड), मा. विजय बजाज (डेप्युटी मॅनेजर, संगमनेर) व मा. नारायण परजणे (सहाय्यक निबंधक, श्रीगोंदा) आदी मान्यवरांचा समावेश आहे. उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. सदर प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार असून सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० या वेळेत सत्रे पार पडणार आहेत.

# धर्मरक्षण, स्त्रीसन्मान आणि जनतेचे राज्य हाच शिवधर्म : मंगेश दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शुक्रवार दि. २० फेब्रुवारी २०२६ शिरापुर, चासकरवाडी येथे शिवमुद्रा प्रतिष्ठान आयोजित शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला यावेळी उद्योजक मंगेश दाते बोलत होते आमदार काशिनाथ दाते सर यांच्या स्थानिक विकास निधीतून स्मशानभूमी सुशोभीकरण करण्याकरिता दहा लक्ष रुपये व नामदार विखे साहेबांनी दिलेल्या हायमास्टचे लोकार्पण करण्यात आले. चासकरवाडी सारख्या छोट्या वाडीत शिवरायांचे विचार पेरले जातात ही अतिशय आनंदाची बाब आहे शिवरायांचे विचार नवीन पिढी आत्मसात करते ही समाजासाठी प्रेरणादायी बाब आहे समाजात काम करताना शिवरायांचे विचार घेऊन काम केले पाहिजे, विकास कामांची चिंता करू नका आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीमागे उभे रहा विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही. आज आपण सर्व जण हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, पराक्रमाचे प्रतीक, स्त्रीसन्मानाचे रक्षक आणि दूरदृष्टीचे महानायक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एकत्र आलो आहोत. शिवरायांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ला येथे झाला.




> शिवरायांनी स्त्रियांचा सन्मान राखला, शत्रूच्या स्त्रियांनाही आई-बहिणी प्रमाणे वागणूक दिली. त्यांनी न्याय, नीती आणि प्रजेला केंद्रस्थानी ठेवून राज्य केले. म्हणूनच आजही त्यांचे विचार आणि आदर्श आपल्याला प्रेरणा देतात. आजच्या दिवशी आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याची प्रतिज्ञा करूया. आपल्या जीवनात प्रामाणिकपणा, धैर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेम जोपासूया. **- मंगेश दाते, उद्योजक पारनेर**

त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांनी त्यांच्यावर संस्कारांची अमूल्य शिदोरी दिली, तर शहाजी राजे भोसले यांच्याकडून त्यांना शौर्याची परंपरा लाभली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. किल्ल्यांची बांधणी, आरमाराची उभारणी, शिस्तबद्ध प्रशासन आणि सर्वधर्मसमभाव या तत्त्वांवर त्यांनी राज्यकारभार केला.

शत्रूशी लढताना त्यांनी गनिमी काव्याची नीती अवलंबली आणि मोठ्या साम्राज्यांनाही पराभूत केले.

यावेळी आर.एस.कापसे सर, सचिन पाटील वराळ, दिनेश बाबर, भास्कर उचाळे, विठ्ठलराव कवाद, शिवराज कदम, भिवा चासकर, बबन गुंड सर, सागर नरसाळे, भानुदास खुळे, सुभाष चासकर, साहेबराव चासकर, पोपट खुळे, अनिकेत चासकर, बाळकृष्ण चासकर, ओंकार चासकर, आकाश पिंगट, मोहन चासकर, अक्षय चासकर, प्रवीण वाळुंज, सचिन चासकर, रवी पिंगट, अनिल चासकर, आकाश पिंगट, कार्तिक चासकर, शिवाजी खुळे, बाळू मुंजाळ, महादू चासकर, संपत भाईक, पोपट चासकर, शुभम नरसाळे, बाबजी भाईक,चैतन्य चासकर, रमेश चासकर इ. मान्यवर उपस्थित होते.

# कॉस्ट अकाउंटंट्सनी कुशल, तज्ज्ञ होण्यास प्राधान्य द्यावे

## डॉ. पराग काळकर यांचे प्रतिपादन; 'आयसीएमएआय'च्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कॉस्ट अकाउंटंट्स हे आव्हानात्मक आणि देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारे क्षेत्र आहे. त्यामुळे नीतिमूल्याची जपणूक करीत विषयाचे सखोल ज्ञान घेत या क्षेत्रातील 'तज्ज्ञ' होण्यास प्राधान्य द्यावे," असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंट्स ऑफ इंडिया (आयसीएमआय) पुणे चॅप्टरतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात डॉ. काळकर बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या



समारंभावेळी जीएसटी सहआयुक्त सीएमए संजाली डायस, 'आयसीएमआय'चे उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, विभागीय समिती सदस्य सीएमए चैतन्य मोहरीर, सीमए डॉ. संजय भार्गवे, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, स्टुडेंट कोऑर्डीनेशन कमिटीचे चेअरमन सीएमए अमेय टिकले, खजिनदार सीएमए तनुजा मंत्रवादी, सीएमए हिमांशू दवे, अनुजा दाभाडे आदी उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसरडा, सीएमए हनुमंत जमदाडे व सीएस कल्याणी शिरोडे यांनी मार्गदर्शन केले. सीएमए सौमित्र बावठाणकर स्मरणार्थ उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना, तर पीसीसीए आर्ट सर्कल व संदीप जोशी परिवाराच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

डॉ. पराग काळकर म्हणाले, "सीएमए विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवून थांबू नये. कृत्रिम बुद्धिमता, नाविन्यता, नवनवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आत्मसात केले, तर तुम्हाला असंख्य संधींची दारे खुली आहेत. तंत्रज्ञान आणि एआयमुळे मूलभूत कामे यंत्रांद्वारे होत असली, तरी निर्णयक्षमता ही माणसाचीच ताकद आहे. व्यावसायिक आयुष्यात सतत रिस्किलिंग आणि अपस्किलिंग करत राहा. देशातील पायाभूत सुविधा, वित्त, प्रकल्प व्यवस्थापन आणि शाश्वत विकास यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा."

सीएमए संजाली डायस यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही नोकऱ्या कमी करणारी नव्हे, तर नव्या संधी निर्माण करणारी परिवर्तनशील शक्ती असल्याचे स्पष्ट केले. जागतिक स्तरावर एआयमुळे रोजगारांबाबत मिश्र चित्र दिसत असले, तरी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणारे, नवे कौशल्य आत्मसात करणारे आणि बदल स्वीकारणारे व्यावसायिक भविष्यात अधिक यशस्वी ठरतील. मानवी संवेदनशीलता, समजूतदारपणा आणि विश्लेषणक्षम विचारशक्ती हीच खरी व्यावसायिकांची ताकद असते, असे त्यांनी सांगितले.

सीएमए नीरज जोशी म्हणाले, "सीएमए प्रोफेशनल्स म्हणून काम सुरु केले, तरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून सतत शिकत राहावे. संस्थेशी जोडून घ्यावे. त्यातून या व्यवसायातील नवनवीन गोष्टी शिकण्यास मदत होते. वरिष्ठांच्या अनुभवातून या क्षेत्राचे वेगळे पैलू समजतात. सेवा क्षेत्रात सीएमएना मोठी मागणी होत आहे. त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या मोठ्या संधींचा लाभ घेण्यासाठी देश-परदेशात, नोकरी-व्यवसायात जाण्याची तयारी ठेवावी."

सीएमए चैतन्य मोहरीर व डॉ. संजय भार्गवे यांनीही मार्गदर्शन केले. सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली यांनी 'आयसीएमएआय'च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. सीएमए अमेय टिकले यांनी प्रास्ताविक केले. सीएमए राहुल चिंचोळकर यांनी स्वागत-परीचय करून दिला. तन्वी वैद्य, वैष्णवी जोशी व प्राची भुतडा यांनी सूत्रसंचालन केले.

## सुखी जीवनासाठी शिवतत्त्व व श्रीकृष्ण तत्त्व आत्मसात करणे आवश्यक – डॉ. रवींद्र भोळे



**पुरंदर : (समर्थ गांवकरी)**

मनुष्य आयुष्यभर भौतिक सुखाच्या मागे धावत राहतो आणि मोहमायेच्या जाळ्यात अडकून जीवनाच्या प्रारंभ, मध्य व अंत या टप्प्यांचा विचार करत नाही. जन्म, वृद्धत्व आणि मृत्यू या अटळ सत्यांमधून प्रत्येकाला जावे लागते. त्यामुळे पृथ्वीवर अस्तित्व असेपर्यंत सुखी, समाधानी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी शिवतत्त्व आणि श्रीकृष्ण तत्त्व आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे महाराज यांनी केले. महाशिवरात्रीच्या शुभपर्वानिमित्त शांताराम गिरी महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्यात त्यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. शिवतत्त्व म्हणजे सर्वव्यापी चैतन्य, अंतर्गत शांती, संरक्षण आणि आवश्यकतेनुसार विनाशाची शक्ती, असे सांगत त्यांनी भगवद्गीतेतील प्रकृती, जीवात्मा, कालचक्र, कर्म आणि परमेश्वर या तत्त्वज्ञानाचा उलगडा करून कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, निष्काम कर्मयोग आणि मोक्षप्राप्ती यांचा मार्ग म्हणजे श्रीकृष्ण तत्त्व असल्याचे स्पष्ट केले. पुरंदरची भूमी साधू-संतांच्या वास्तव्याने पवित्र झालेली असून येथे अनेक सुप्रसिद्ध देवस्थाने आहेत. या देवस्थानांचा जिर्णोद्धार व विकास केल्यास पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थकारणाला बळ मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास संपत खेडेकर (माजी सरपंच), परशुराम खेडेकर (माजी उपसरपंच), बापू मार्तंड खेडेकर, उत्तम नामदेव खेडेकर, मधु खेडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अल्पवयीन युवकांच्या दोन गटांत हाणामारी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नविन नांदेड परिसरातील हाडको बस स्टॉप भागात २ गटांमध्ये हाणामारी झाल्याची घटना दि २१ फेब्रुवारी रोजी दुपारी १ ते २ च्या दरम्यान झाली. यात दोन धारदार खंजर या शस्त्रा सह दोन गटात म्हणजे जवळपास १० ते १२ जणांत हाणामारी झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी २ आल्पवयीन युवक ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदर घटना दि २१ फेब्रुवारी रोजी दुपारी १ ते २ वाजता च्या दरम्यान वा घडली. आहे .यामुळे काही काळ परिसरात भितीचे वातावरण पसरले होते. हडको नवीन नांदेड भागातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या परिसरात दोन गटांमध्ये शनिवारी दुपारी हाणामारी झाली.

## खंबाळा ग्रामस्थांचे १७ फेब्रुवारीपासून साखळी व आमरण उपोषण

- पुनर्वसन व भूसंपादनाचा प्रश्न पेटला
- संत सेवालाल महाराज मंदिरासमोर आंदोलनाला सुरुवात

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील खंबाळा (ता. किनवट, जि. नांदेड) येथील धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी दि. १७ फेब्रुवारी २०२६ पासून सकाळी १० वाजता संत सेवालाल महाराज मंदिर मैदान येथे साखळी व आमरण उपोषण सुरू करण्याचा ठाम इशारा दिला आहे. या आंदोलनाबाबतचे निवेदन पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मांडवी, जिल्हाधिकारी नांदेड, तहसीलदार किनवट, धरण प्रशासन आर्णी (जि. यवतमाळ)



येथील कार्यकारी अभियंता तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी येथील वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात आले आहे. २००७ ते २०१३ मधील जमीन संपादन; पुनर्वसन मात्र रखडले : ग्रामस्थांच्या माहितीनुसार सन २००७ ते २०१३ या कालावधीत खंबाळा गावातील शेतजमिनी धरण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या. मात्र २०२५ पर्यंत अनेक शेतकऱ्यांना संपूर्ण मोबदला मिळालेला नाही. भूसंपादनाची उर्वरित रक्कम, फळझाडे व पाइपलाईन नुकसानभरपाई, अतिरिक्त घटकाची रक्कम तसेच पुनर्वसनाची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. पुनर्वसनाचा प्रश्न निकाली न काढताच प्रशासनाकडून उपसा सिंचनासारखी कामे सुरू करण्याचा प्रयत्न होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. "आधी पुनर्वसन, नंतरच काम" अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. ग्रामस्थांनी लेखी निर्णय व ठोस कार्यवाहीची मागणी करत आंदोलनाचा निर्धार व्यक्त केला आहे. ऐतिहासिक जमिनींचा प्रश्न; प्रशासनाविरोधात संताप : १५० ते २०० वर्षांपासून कसत आलेल्या जमिनींचा प्रश्न आजही प्रलंबित असल्याने शेतकरी संतप्त आहेत. काही अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता कामे सुरू करतात, त्यामुळे आर्थिक नुकसान होते, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "आमच्या हक्कांवर गदा आणणारी कोणतीही मनमानी सहन केली जाणार नाही," असा इशाराही देण्यात आला आहे.

संपूर्ण ग्रामपंचायत खंबाळा व ग्रामस्थांच्या वतीने आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. चंपत (नाईक) चव्हाण, जियन के. चव्हाण (ग्रा.पं. सदस्य), पुनाराम चव्हाण (ग्रा.पं. सदस्य), विठ्ठल राठोड (माजी सैनिक) यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपोषणात सहभागी होणार आहेत.

## दोन केंद्रांवर दहावीची परीक्षा सुरळीत पहिल्या पेपरला ७ विद्यार्थी अनुपस्थित

### बैठे पथकाचे पथक प्रमुखच अनुपस्थित : प्रशासन काय कारवाई करणार : ऑनलाईन ई - कॅमेऱ्याच्या निगराणीत परीक्षा सुरु

**तामसा : (समर्थ गांवकरी)**


माध्यमिक शिक्षा बोर्डाच्या आज पासून सुरू झालेल्या मराठी विषयाच्या पहिल्या पेपर साठी ५०९ विध्यार्थी पैकी ५०२ विद्यार्थ्यांनी पहिला पेपर च्या परीक्षार्थी उपस्थित.तामसा येथील दोन परीक्षा केंद्रांवर इयत्ता दहावीच्या परीक्षेला २० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. मराठी विषयाच्या पहिल्या पेपरसाठी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा च्या केंद्र संचालक देविदास अकमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद हायस्कूल केंद्रात एकूण २४३ .२३५ मराठी, 8उर्दू माध्यमातून )विद्यार्थ्यांपैकी २३८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून ५ (मराठी माध्यम चे विद्यार्थी अनुपस्थित , तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक केंद्रावर केंद्र संचालक विपी गाडेगावकर यांच्या मार्गदर्शनखाली २६६ परीक्षार्थी २४८



मराठी माध्यम १८उर्दू माध्यम )पैकी मराठी माध्यम चे २ विध्यार्थी अनुपस्थित होते विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

परीक्षा कॉपीमुक्त, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी प्रत्येक केंद्रावर पंचायत, शिक्षण व महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठे पथके परीक्षा संपेपर्यंत कार्यरत ठेवण्यात आली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक शहदेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोउनि अशोक सिंगणवाड,पोहेको चक्रधर पवार, पोहेको रेनेवाड पो.चालक किरण डोरले गृहरक्षक दल चे आडे, शिंदे यांनी सर्व परीक्षा केंद्र परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवून अनुचित घटना घडू नये याची दक्षता घेतली.

चॉकट @शिक्षण विभागाने नेमलेल्या बैठे पथकात पथक प्रमुखचं अनुपस्थित राहिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे महाराष्ट्र राज्यात सुरू असलेल्या इत्या दहावीच्या माध्यमिक बोर्डाचा परीक्षेसाठी मोठी यंत्रणा राबिली जात आहे याच यंत्रणेत बैठे पथकासाठी कृषी विभागात कडून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा तामसा येथे पथक प्रमुख म्हणून एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती. सकाळी दहा वाजता परीक्षा केंद्र वर बैठक पथकातील एलबी चव्हाण,सुरेखा तावडे यांनी परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष पाहणी करून शासन आदेशाची पालन करून आपले कर्तव्य बजावले परंतु पथक प्रमुखच अनुपस्थित राहिल्याने आश्चर्य व्यक्त केला.



## एलआयसी एमएफ टेक्नॉलॉजी फंड केला लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एलआयसी म्युच्युअल फंडाने एलआयसी एमएफ टेक्नॉलॉजी फंड प्रस्तुत करत असल्याची आज घोषणा केली. ही एक थीमॅटिक समभागसंलग्न (इक्विटी) योजना असून, तिची रचना ही पारंपारिक आयटी सेवांच्या पलीकडे विस्तारत असलेल्या भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तृत प्रगतीपथात गुंतवणूकदारांना सहभागी करून घेण्यासाठी करण्यात आली आहे. योजनेचा प्रारंभिक प्रस्तुती कालावधी (एनएफओ) २० फेब्रुवारी २०२६ पासून खुला होईल आणि ६ मार्च २०२६ रोजी तो बंद होईल.

## मैदानावर आता शिक्षकांची बॅटिंग!

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित सर्व फार्मसी महाविद्यालयांतील शिक्षकांसाठी आयोजित दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचा थरार आजपासून सुरू झाला. विद्यापीठ प्रायोजित या विशेष स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते उत्साही वातावरणात पार पडले. मान्यवरांची उपस्थिती आणि प्रोत्साहन या दिमाखदार सोहळ्याला सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे सचिव डॉ. सचिन क्षीरसागर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. माधव पाटील, डी-झोन क्रीडा विभागाचे सचिव डॉ. मीनानाथ गोमचले, फार्मसी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सिद्धेश्वर पाटील तसेच डॉ. शिवप्पा नागोबा यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजनाचा तपशील सदर स्पर्धेचे आयोजन सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,



कुर्तडी व पांगरी या दोन्ही शाखांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या स्पर्धेत लातूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातील २० पेक्षा अधिक फार्मसी महाविद्यालयांच्या शिक्षक संघांनी सहभाग नोंदवला आहे.

कुलगुरूंचे मार्गदर्शन यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरूंनी सांगितले की, "शिक्षकांनी शैक्षणिक कार्याबरोबरच क्रीडा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहण्यास मदत होते. क्रीडा संस्कृतीमुळे संघभावना, नेतृत्वगुण आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो." मैदानावर क्रीडामय वातावरण विद्यापीठाच्या क्रीडा प्रांगणात आयोजित या स्पर्धेत पहिल्याच दिवशी शिक्षकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

पुढील दोन दिवस हे सामने रंगतदार होणार असून, लातूर, नांदेड, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील विविध फार्मसी महाविद्यालयांचे प्राचार्य, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर आणि शिक्षक या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

## पुण्यात संसदीय राजभाषा समितीच्या तिसऱ्या उप-समितीचा निरीक्षण कार्यक्रम



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

केंद्र सरकारच्या माननीय संसदीय राजभाषा समितीच्या तिसऱ्या उप-समितीचा निरीक्षण कार्यक्रम १८ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पुण्यात पार पडला. या कार्यक्रमांतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रधान कार्यालयात राजभाषा हिंदीच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या निरीक्षण कार्यक्रमाचा उद्देश केंद्र सरकारच्या कार्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि वित्तीय संस्थांमध्ये राजभाषा धोरणांची अंमलबजावणी, हिंदीतील कार्यालयीन कामकाज, पत्रव्यवहार, प्रशिक्षण व जनसंपर्क यासंबंधीची स्थिती तपासणे हा होता. उप-समितीच्या सदस्यांनी संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांशी चर्चा करून विविध बाबींचे सादरीकरण ऐकून घेतले. कार्यक्रमादरम्यान राजभाषेच्या वापरात झालेली प्रगती, अडचणी तसेच पुढील सुधारणा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच हिंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला. संसदीय राजभाषा समितीचे हे निरीक्षण दौरे केंद्र सरकारच्या राजभाषा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे मानले जातात.

## टेक सोल्युशन्स भारताच्या ३७० अब्ज डॉलर्सच्या आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी इंडिया एआय मिशनशी सुसंगत स्केलेबल युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म उभारणार

**चेन्नई: (समर्थ गांवकरी)**

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026 च्या पार्श्वभूमीवर टेक सोल्युशन्स लिमिटेड ने आज एक व्यापक युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म विकसित करण्याच्या आपल्या धोरणात्मक योजनेची घोषणा केली. आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला हा प्लॅटफॉर्म एक एकात्मिक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लेयर म्हणून काम करेल, ज्यामुळे रुग्णालये, डायग्नोस्टिक प्रयोगशाळा, क्लिनिकल ट्रायल संस्था आणि क्लिनिक यांना कृत्रिम बुद्धिमत्ता उपाय सहजपणे स्वीकारता आणि वापरता येतील.

ही पुढाकार टेक सोल्युशन्सच्या प्रवासातील एक परिवर्तनात्मक पाऊल ठरते आणि समाजाच्या व्यापक हितासाठी एआय ला एक महत्त्वाचे विकास साधन म्हणून पुढे नेण्याच्या भारत सरकारच्या प्रयत्नांशी सुसंगत आहे. देश 370 अब्ज डॉलर्सच्या आरोग्य क्षेत्रासोबतच 197 अब्ज डॉलर्सच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा संधी उघडण्यावर लक्ष केंद्रित करत असताना, हा प्लॅटफॉर्म "सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय" या समिटच्या मुख्य संकल्पनेला प्रतिबिंबित करतो, ज्यामुळे प्रगत तंत्रज्ञान प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचेल.

आरोग्य सेवा पुरवठादारांसाठी एआय चे लोकशाहीकरण: स्केलेबल डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे आणि आरोग्यसेवा पुरवठ्यातील दरी कमी करणे या सरकारच्या प्राधान्याशी सुसंगत राहून, प्रस्तावित प्लॅटफॉर्म एक व्यापक हेल्थकेअर एआय मार्केटप्लेस आणि इंटिग्रेशन लेयर म्हणून कार्य करेल. यामुळे शहरी केंद्रांपासून ते दुर्लक्षित समुदायांपर्यंतच्या आरोग्यसेवा पुरवठादारांना विविध एआय-आधारित अनुप्रयोग एका एकात्मिक प्रणालीद्वारे सहज उपलब्ध होतील, वापरता येतील आणि व्यवस्थापित करता येतील. तंत्रज्ञान स्वीकारण्यातील अडथळे, अंमलबजावणीतील गुंतागुंत आणि प्रारंभिक गुंतवणूक कमी करून हा प्लॅटफॉर्म परवडणाऱ्या आणि सुलभ आरोग्यसेवेच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला पाठबळ देतो.

हा प्लॅटफॉर्म सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाच्या अनेक वापर प्रकरणांना समर्थन देण्यासाठी तयार केला जात आहे, ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

- निदान आणि पॅथॉलॉजी ऑटोमेशन: लवकर तपासणी आणि स्क्रीनिंग सक्षम करून तज्ज्ञांच्या कमतरतेवर मात.
- क्लिनिकल डिसिजन सपोर्ट सिस्टीम्स: डॉक्टरांना डेटा-आधारित अंतर्दृष्टी प्रदान करणे.
- रुग्णालयीन कार्यप्रवाह आणि ऑपरेशनल ऑटोमेशन: मोठ्या रुग्णसंख्येचे व्यवस्थापन करताना कार्यक्षमता वाढवणे आणि खर्च कमी करणे.
- क्लिनिकल ट्रायल ऑप्टिमायझेशन आणि रुग्ण डेटा इंटेलिजन्स.
- प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सक्रिय आरोग्य व्यवस्थापनाचा विस्तार.

परिणामकारकता आणि शाश्वत वाढ साध्य करणे: जागतिक आणि देशांतर्गत आरोग्य क्षेत्र तंत्रज्ञान-चालित युगात प्रवेश करत असताना—आणि आरोग्य क्षेत्रातील जागतिक एआय बाजारपेठ 2030 पर्यंत 180 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक होण्याची अपेक्षा असताना—टेक सोल्युशन्स भारताच्या एआय-आधारित आरोग्य परिवर्तनाचा एक महत्त्वाचा सक्षमकर्ता म्हणून स्वतःची भूमिका मजबूत करत आहे. क्लिनिकल परिणाम सुधारण्यासाठी आरोग्यसेवा पुरवठादार तंत्रज्ञानावरील खर्च वेगाने वाढवत आहेत, ज्यामुळे वास्तविक परिणाम देणाऱ्या स्केलेबल प्लॅटफॉर्मसाठी मोठी संधी निर्माण होत आहे. एकात्मिक एआय मार्केटप्लेस उपलब्ध करून देत टेक सोल्युशन्स मोठ्या प्रमाणावर आरोग्यसेवा पुरवठादारांना जोडण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे, ज्यामुळे स्केलेबल उत्पन्न निर्माण होईल आणि इंडिया एआय मिशन अंतर्गत समावेशक विकास आणि तांत्रिक स्वावलंबन या देशाच्या व्यापक सामाजिक-आर्थिक उद्दिष्टांना थेट पाठबळ मिळेल.

# संघटनात्मक बांधणीला प्रारंभ करा : आ. कल्याणकर




**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

आगामी काळात होऊ घातलेल्या जि. प., पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेनेला भक्कम यश मिळवून देण्यासाठी पक्षांचे सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आता संघटनात्मक बांधणीला प्रारंभ करावा अशी सूचना आ. बालाजी कल्याणकर यांनी केली. शहरातील शासकीय विश्रामगृहात आज शुक्रवारी दुपारी नांदेड उत्तरचे आ. बालाजी कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेना (शिंदे) पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मनपा निवडणुकीत विजयी झालेले नगरसेवक, पराभूत झालेले उमेदवार यांची बैठक पार पडली. या बैठकीला जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, गंगाधर बडूरे, मंगेश कदम, नगरसेवक संदिप सिंघ गाडीवाले आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी पुढे बोलतांना आ. कल्याणकर म्हणाले, पुर्वी पार पडलेल्या मनपा निवडणुकीत आपण भक्कमपने रणनीती आखली होती. विरोधक फार ताकदवान आहेत हे ओळखून आपले उमेदवार मोठया संख्येने निवडून यावेत म्हणून बारकाईने नियोजन केले होते. परंतु नेत्यांनी केलेल्या नियोजनाला प्रत्यक्ष अमलबजावणीत रूपांतर करण्यात खालची यंत्रणा कमी पडली. त्यामुळे मनपा निवडणुकीत आपणास निर्धारित यश गाठता आले नाही. आपला विरोधक जरी बलवान असला तरी आपणही कुठे कमी पडलो नाहीत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे यांचे भक्कम पाठबळ आपणास मिळाले होते. त्याच बळावर आपण जोर लावला होता. परंतु केवळ संघटनात्मक बांधणी कमी पडल्यामुळे आपले कमी उमेदवार निवडून आले. हा निकाल फारसा चांगला नसला तरी त्यामुळे निराश न होता आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लक्षात घेऊन पक्षाच्या बांधणीसाठी आजची बैठक घेण्यात आली आहे. मी कार्यकर्त्यांना काहीच कमी पडू देणार नाही. नेहमीच त्यांच्या पाठीशी भक्कम पणे उभा आहे व त्यांच्या हाकेला धाऊन गेलो आहे आणि या पुढेही कार्यकर्त्यांना एकटे पडू देणार नाही असे अभिवचन आ. कल्याणकर यांनी यावेळी दिले. तत्पूर्वी जिल्हाप्रमुख उमेश मुंढे, गंगाधर बडूरे, मंगेश कदम, नगरसेवक संदिपसिंघ गाडीवाले यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले आहे.

# सार्वजनिक शिवजन्मोत्स मोठ्या उत्साहात साजरा



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दि १९ फेबुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छावा श्रमीक संघटना ,जिजाऊ प्रतिष्ठाण नांदेड व N.T.S.A च्या विद्यमाने आयोजीत एस पि ऑफीस समोर डॉ हंसराज वैद्य हॉस्पीटल समोर वजीराबाद चौक नांदेड येथे सर्वजनिक शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय . उपनिरिक्षक पुयड पाटील व समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे . स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने यांच्या हस्ते पुजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी शिवरत्न पुरस्कार . शिवधर्म पुरस्कार . व भव्य अन्नदान वाटप कार्यक्रम राबविण्यात आला तसेच सामाजिक उपक्रमातील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते यांचा सम्मान सत्कार पुरस्कार देऊन करण्यात आला यावेळी शिवाजी महाराज यांच्या वर भाषण केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गोल्ड मेडल देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमा प्रसंगी स्थानिक गुन्हे शोध पथकाचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय . माजी सभापती सतिष पाटील उमरेकर . डॉ शितल भालके . उपक्रम समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे व स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने . दिपुसिंघ सोडी . पुजा बिसेन .गंगाप्रसाद काकडे , भाग्यश्री करंदीकर . सुजाता पांपटवार . शंकर धिरडीकर 'प्रा हनमंते सर .उदय सिंह कच्छवा . लक्ष्मीकांत पत्तेवार . संतोष शिंदे यांच्या सह आदी ची उपस्थिती होती . समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे व स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने यांच्यी वतीने अॅड यांना दिलीप ठाकुर (शिवधर्म ) सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले माजी जिप सदस्य

गंगाप्रसाद काकडे यांना शिवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर शंकर धिरडीकर यांना (शिवरत्न )पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला.

# १९व्या प्रतिबिंब चित्रपट महोत्सवात नॅशनल फोटोग्राफी स्पर्धेत उदय जोशी यांच्या छायाचित्रास ज्युरी अॅवाड




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अ. जि. म. वि. प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या संज्ञापन अभ्यास विभागातर्फे आयोजित १९ वा प्रतिबिंब चित्रपट महोत्सव नुकताच संपन्न झाला.

या निमित्ताने राष्ट्रीय प्रतिबिंब छायाचित्र स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे. नैसर्गिक आपत्ती हा यावर्षीची फोटोग्राफीचा विषय होता. या स्पर्धेकरीता ५३२ छायाचित्रकारांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. यापैकी २९७ स्पर्धकातून उदय जोशी यांची ज्युरी अॅवाड मिळाला आहे. दिग्दर्शक संकेत पावसे, व्हाईस प्रिन्सिपल डॉ. बाळासाहेब सागडे, अ. जि. म. वि. प्र. समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, प्रा. संदिप गिऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यू आटर्सच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात हा समारंभ संपन्न झाला.

नैसर्गिक आपत्ती या विषयाला अनुसरून आगडगाव परीसरातील छायाचित्राला पारीतोषिक मिळाले असून सदर पाण्याकरीता आलेल्या टॅकमधील पाणी भरतानाचे ते छायाचित्र आहे. महिला पुरूषांनी गदी केली आहे पाणी परत कधी मिळणार यामुळे पाणी साठवून ठेवण्यासाठी आपल्या घरातील सर्व साहित्य ज्यात पाणी साठवता येईल ते आणले होते.

त्यावेळी टैकर कमी येत असल्याने पाण्यासाठी गदी होत होती याकरीता सर्वजण लहान मुले, महिला वृध्द नागरिकही मदत करत होते. या यशाबददल विविध मान्यवरांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# २५० ग्रामीण महिला उद्योजक डिजिटलदृष्ट्या सक्षम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिलांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोच्या सहकार्याने राबविलेल्या उपक्रमातून पुणे जिल्ह्यातील २५० महिला उद्योजकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे महिलांच्या डिजिटल कौशल्यांबरोबरच त्यांच्या उत्पन्न क्षमतांनाही लक्षणीय बळ मिळाल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर या भागांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. हस्तकला, हातमाग, उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करता यावा आणि व्यवसाय वाढीस चालना मिळावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## 'नगर शहरात खळबळ'

# माजी महापौर अभिषेक कळमकराविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळकराविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे. शाळेत नोकरीला लावून देतो, असे अमिष दाखवून, वारंवार अत्याचार केल्याचे युवतीने फिर्यादीत म्हटले आहे. पीडित युवतीच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे. अभिषेक कळमकर हा पसार झालेला आहे. अजित पवार राष्ट्रवादीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्याविरोधात अभिषेक कळमकर याने शरद पवार राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवली होती. हा गुन्हा दाखल झाल्याने अहिल्यानगरमधील राजकारणात खळबळ उडाली आहे. पीडित युवती ही शिरूर तालुक्यातील असून, एमआयडीसी पोलिसांकडे तिने आज पहाटे येऊन तक्रार दिली. पीडित युवतीने फिर्यादीत म्हटले आहे की, तीन महिन्यापूर्वी नोकरीच्या शोधात अहिल्यानगरमध्ये आली. तिथं अभिषेक कळमकर याच्या सोशल मीडियावरून संपर्क क्रमांक मिळवत संपर्क केला. परिस्थिती सांगून, नोकरीची गरज असल्याचे सांगितले. दोन-तीन दिवसांनी कुष्ठधाम रोडवर इथं भेटायला मिळवले. तिथं कागदपत्र घेत, एमआयडीसीत माझी शाळा आहे, तिथं कामाला लावून देतो, असे सांगितले. ही शाळा बघण्यासाठी बोलवल्यानंतर, तिथं पीडित युवती आली. या वेळी पीडित युवतीला केडगाव बायपासला उतरवले. अभिषेक कळमकर हा तिथं अलिशान वाहनातून येऊन, मला घेऊन विळद घाट इथं गेला. गाडीत आम्ही दोघे होतो. तिथं गाडी हायवे लगत थांबवून थंडपेय दिले. थंड पेय पिल्यानंतर गुंगी आली. त्यावेळी कळमकर हा आपल्याला स्पर्श करत होता. तिथं वाहनात माझे कपडे काढून जबरदस्ती केल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेनंतर आपण खूप घाबरलो होतो. झालेला प्रकार कोणालाच सांगितला नाही. त्यानंतर दोन दिवसांनी अभिषेक कळमकर याने व्हॉट्सअपवर व्हिडिओ कॉल करून, कपडे काढण्यास सांगितले. विरोध केल्यावर जीवे मारण्याची धमकी दिली. या त्रासाला कंटाळून व्हिडिओ कॉलचे स्क्रिने रेकॉर्डिंग केल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. यानंतर अभिषेक कळमकर याने १८ फेब्रुवारीला कागदपत्र घेऊन शिरूर इथल्या मारवेल हॉटेलवर बोलावलं. नोकरीबद्दल बोलायचे आहे, असे सांगून कळमकर याने एका व्यक्तिसोबत हॉटेलमधील रूम नंबर ११० मध्ये पाटवले. तो व्यक्ती तिथून गेल्यावर अभिषेक कळमकर तिथे आला अन् माझ्याबरोबर जबरदस्तीने शरीर संबंध ठेवले. या प्रकाराचे व्हिडिओ देखील काढले. या शरीर संबंधाच्या कोणाला सांगितल्यास, मला आणि माझ्या मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे पीडिताने फिर्यादीत म्हटले आहे. एमआयडीसी पोलिसांनी कळमकर याच्या शोधात तपास सुरू केला आहे.

# विद्रोही साहित्यिकांच्या स्वागतासाठी नांदेड नगरी सज्ज

■ २७, २८ फेब्रुवारी व ०१ मार्च रोजी होणार २० वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन : स्वागताध्यक्ष राहुल प्रधान यांची माहिती



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

विद्रोही सांस्कृतिक चळवळ आयोजित व संविधान मूल्यांना समर्पित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून २७, २८ फेब्रुवारी व ०१ मार्च रोजी होणाऱ्या या संमेलनासाठी सायन्स कॉलेजच्या सदाशिव पाटील क्रीडा संकुलाच्या मैदानावर उभारण्यात आलेली साहित्य नगरी विद्रोही साहित्यिकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष राहुल प्रधान यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस डॉ. राजेंद्र गोणारकर , डॉ. अनंत राऊत , प्रा. विठ्ठल भंडारे , इंजि .भीमराव हाटकर , राज गोडबोले , इंजि. भारत कानिंदे , विठ्ठल असूरे , कॉ. उज्वला पडलवार , डॉ. विजयकुमार माहुरे आदींची उपस्थिती होती.

संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत (नागपूर) यांची निवड झाली असून उद्‌घाटक म्हणून हिंदीतील ख्यातनाम समीक्षक डॉ. बजरंग बिहारी तिवारी (दिल्ली) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड (दिल्ली) यांची उपस्थिती लाभणार आहे.

इंजि. चंद्रशेखर शिखरे, डॉ. रेखा शेळके आणि डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली तीन स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. विशेष आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध पत्रकार राजू परुळेकर यांचे व्याख्यान होणार आहे. संमेलनात निमंत्रितांच्या कवी संमेलनासह तीन स्वतंत्र कवी संमेलने पार पडणार आहेत. तसेच सुप्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते मिलिंद शिंदे (मुंबई )यांच्याशी डॉ. राजेंद्र गोणारकर संवाद साधणार असून त्यांच्या कविताही रसिकांना ऐकावयास मिळणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रेमानंद गज्वी लिखित 'घोटभर पाणी' ही एकांकिका सादर होणार आहे. तसेच 'मी जनाबाई' आणि 'मी सावित्रीबाई फुले' हे एकपात्री प्रयोगही रंगणार आहेत. याशिवाय सुप्रसिद्ध पत्रकार ज्ञानेश महाराव यांचे 'शाहिरांचे गणराज्य – लोकशाहीचा सांस्कृतिक प्रवास' हे संगीत व्याख्यान होणार आहे. संमेलनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजे दि २७ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता, पँथर पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांवर आधारित 'भयंकराच्या दरवाजात कोण' हे नृत्यनाट्य सादर करण्यात येणार आहे.

# ऑक्सिस कॅपिटलची सिग्रेचर ग्लोबल 'खरेदी करण्याची' शिफारस

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ब्रोकरेज फर्म ऑक्सिस कॅपिटलने सिग्रेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडसाठी 'बाय' रेटिंग देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने नुकतीच आरएमझेड सोबत भागीदारीद्वारे व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्रात प्रवेशाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. हा कंपनीच्या वाढीचा प्रमुख चालक असल्याचा दाखला ऑक्सिस कॅपिटलने दिला आहे. ऑक्सिस सिक्युरिटीजने कंपनीचे 'बाय' रेटिंग १,३०० रुपयांच्या लक्ष्य किमतीसह कायम ठेवले आहे. या स्टॉकच्या किमतीत २२% पर्यंत वाढ होण्याची शक्यता त्यातून दर्शविण्यात आली आहे.

# सुगाव (बु.) येथील वळण रस्ता ठरतोय धोकादायक



**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ते बिदर जाणारा नॅशनल हायवे क्रमांक १६१ या रस्त्याला एकूण २२ वळण असून सुगाव (बु.) येथील वळण फारच धोकादायक असुन या ठिकाणी अनेक अपघात होत आहेत. एखाद्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती अपघाताने मृत्यू पावला तर याला जबाबदार कोन? अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

बऱ्याच वेळा या अपघाती वळणाचा अंदाज न आल्यामुळे दुर्घटना घडतात. वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून वाहने चालवावे लागत असल्याचे पाहायला मिळत आहे. सुगाव (बु) वरील हायवे क्रमांक १६१ च्या लगतच जिल्हा परिषद शाळा असल्यामुळे मुलांना सुद्धा ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते आहे. यामुळे पालकांचा अर्धा जीव मुलांमध्ये तर तर अर्धा जीव रोजंदारी मध्ये अडकला आहे. मुलांना घडवण्यासाठी लोकांची मजुरी करून उपजीविका भागविणाऱ्या पालकांना मोठया चिंतेचा विषय बनला आहे. शाळा अगदी रस्त्या लगत असल्यामुळे मुलांबद्दल मनात धडकी बसली आहे. एक तर काम केल्याशिवाय पोट भरत नाही दुसरी गोष्ट म्हणजे मुलं घरी येईपर्यंत जीवात जिव राहत नाही. आतापर्यंत या ठिकाणी अनेक अपघात घडले असून अनेक वाहनधारकांना याचा फटका सहन करावा लागला आहे.

या हायवे वरील २२ वळणापैकी सुगावचा वळण सर्वात घातक आहे. या ठिकाणी सूचनाफलक सुद्धा लावला नसल्यामुळे वाहन चालक बुचकळात पडतो आहे. वळणाच्या बाजूला नवीन वस्ती निर्माण झालेली आहे. या वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या मनात कायम भीती निर्माण झाली आहे. कधी धोका होईल हे सांगता येत नसल्याने सध्या नवीन वस्तीमध्ये भीतीचे वातावरण आहे. म्हणून संबंधित प्रशासनाने याकडे विशेष लक्ष घालून हा रस्ता सरळ करावं असे मत सुगाव बु येथील नागरिक व वाहनधारकांनी प्रसारमाध्यमासी बोलताना व्यक्त केलं आहे.

शासनाने या बाबीचा विचार करून रस्त्याचं काम लवकरात लवकर करून वाहनधारकांना सहकार्य कराव अशी मागणी सुगाव नगरीतील लोकांनी केली आहे.

# साळी समाजाला कायमच सहकार्य

## उपमहापौर धनंजय जाधव



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर आमच्या आजी आजोबाच्या काळापासून वडिलांचे व माझे कायमच स्वकुळ साळी समाजाला सहकार्य राहिलेले आहे आणि ते मिळालेल्या पदाच्या माध्यमातून कायम राहील असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले. स्वकुळ साळी हित संवर्धक मंडळाच्या वतीने धनंजय जाधव उपमहापौर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी गजेंद्र सोनवणे, विजय मानकर,संजय सागावकर,जितेंद्र लांडगे, सौ.अनुजा कांबळे,संजय दळवी, चंद्रकांत मानकर,प्रकाश मारवाडे,सोमनाथ खाडे, योगेश भागवत, योगेश पांढरपोटे.निरज चांगटे आदी उपस्थित होते. विक्रम पाठक यावेळेस म्हणाले की आजपर्यंत समाजाला कृष्णा भाऊ व धनु भाऊ यांनी वेळोवेळी खूप सहकार्य केले आहे. त्यामुळे धनंजय जाधव हे उपमहापौर झाल्याचा समाजाला मनस्वी आनंद झाला आहे. त्यांनी आम्हाला दत्तमठाच्या बांधकामासाठी तसेच शाळेसाठी वॉल कंपाऊंड बांधून देण्यास सहकार्य केले आहे.

# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे सर्व समाजाचे दैवत : बाळासाहेब भुजबळ



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीचे भूमीपूजन तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

माळीवाडा येथे फुले दाम्पत्यांचे भव्यदिव्य असे स्मारक होत आहे.ही माळी समाजासाठी भुषणवाह बाब आहे.आमदार संग्राम जगताप यांनी स्मारकाच्या कामासाठी मोठा निधी दिल्याने शहराच्या वैभवात भर पाडणारे भव्य दिव्य असे स्मारक उभे राहणार आहे. हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे.यासाठी सकल माळी समाज एकवटला आहे. हे स्मारक अत्यंत देखणे व भव्य दिव्य व्हावे यासाठी माळीवाडा परिसरात काही अतिक्रमणे हटविण्यात यावी.अशी सकल माळी समाजाची मागणी आहे. फुले दाम्पत्यांनी सर्व समाजासाठी ज्ञानाची द्वारे खुली केली आहेत.

थोर समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले हे सर्व समाजाचे दैवत आहेत.स्मारक उभारणीच्या कामात येणारे अडथळे सोडविण्यासाठी महात्मा फुले यांच्या अनुयायी यांना सोबत घेऊन लढा उभारला जाईल.

असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे. रंगारगल्ली येथील एसटी महाले मंगल कार्यालय येथे सकल माळी समाजाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा उभारणी लवकर करावा.यासाठी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे,बाजार समितीचे संचालक संतोष म्हस्के, विश्वस्त विनोद पुंड,डॉ.रणजीत सत्रे,अर्जुन बोरुडे, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे,संजय गारुडकर राजेंद्र ताठे,अशोक आगरकर, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त पंडितराव खरपुडे, फुले ब्रिगेडचे अध्यक्ष दीपक खेडकर महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे,अमोल भांबरकर, माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, मनोज भुजबळ, कॅप्टन सुधीर पुंड,सुरेश कावळे,प्रसाद कोके,चंद्रकांत पुंड, राजाराम चिपाडे, प्रकाश शिंदे,डॉ.दामोदर कळमकर, रमेश चिपाडे,भास्कर चौधरी, रोहित पठारे,सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे,अर्जुन गोंधळे,अभय दातरंगे, रामदास फुले,कुंडलिक गदादे,विवेक फुलसौंदर,दिनेश कापरे, बाबासाहेब दळवी आदी उपस्थित होते. किशोर डागवाले म्हणाले, महात्मा फुले व सावित्री बाई फुले यांचा पूर्ण कृती पुतळा लवकर उभारण्यात यावा अशी सर्व समाजाची मागणी आहे. फुले दांपत्यांचे भव्यदिव्य असे स्मारक व्हावे.अशी सर्व नगरकरांची भावना आहे.या उभारणीच्या कामात येणारे सर्व अडथळे दूर करण्यासाठी सकल माळी समाजाचे शिष्टमंडळ

सर्व समाजाच्या विविध नेत्यांच्या गाठीभेटी घेतील. पंडितराव खरपुडे म्हणाले, फुले दांपत्यांचे माळीवाडा येथे होणारे स्मारकामूळे शहराच्या वैभवात भर पडेल.माळीवाडा चौकातून श्री विशाल गणपती मंदिर, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक,वाडीया पार्क, जिल्हा परिषद अशी पाच रस्ते जातात.या पाचही रस्त्यावरून हे स्मारक दिसावे. यावेळी संजय गारुडकर, दिपक खेडकर,डॉ. दामोदर कळमकर, अर्जुन बोरुडे, डॉ.रणजीत सत्रे, अमोल भांबरकर,जालिंदर बोरुडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राजेंद्र पडोळे यांनी केले.तर आभार विनोद पुंड यांनी मांडले.

# भारतात AI व सायबर धोका संशोधन केंद्र

## राष्ट्रीय सायबर सुरक्षेला मिळणार बळ



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

क्लाउड सुरक्षा क्षेत्रातील अग्रणी कंपनी Zscaler आणि भारतातील प्रमुख दूरसंचार सेवा प्रदाता Bharti Airtel यांनी संयुक्तपणे "AI आणि सायबर धोका संशोधन केंद्र – भारत" (AI & Cyber Threat Research Center – India) स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमाचा उद्देश भारताची सायबर लवचिकता वाढवणे, विश्वसनीय कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्वीकाराला चालना देणे आणि डिजिटल परिसंस्थेचे संरक्षण अधिक मजबूत करणे हा आहे.

हे संशोधन केंद्र बहु-हितधारक व्यासपीठ म्हणून विकसित केले जाणार असून, सार्वजनिक व खाजगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सरकार यांच्यातील सहकार्य वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. दूरसंचार, बँकिंग, ऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील डिजिटल मालमत्ता आणि वापरकर्त्यांचे संरक्षण हे केंद्राचे प्रमुख ध्येय असेल.

भारत सध्या मोठ्या प्रमाणावर डिजिटल परिवर्तनातून जात असून, लोकसंख्या स्तरावर डिजिटल सेवा विस्तारत आहेत. यामुळे सायबर हल्ल्यांचा धोका वाढत आहे. Zscaler च्या ThreatLabz India विभागाने दरमहा लाखो घुसखोरी प्रयत्न नोंदवले असून, राष्ट्र-प्रायोजित सायबर गुप्तहेरगिरी, शून्य-दिवस असुरक्षिततेचा वापर आणि विविध उद्योगांवर लक्ष्यित हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर नव्या संशोधन केंद्राचे काम चार प्रमुख स्तंभांवर आधारित असेल — संरक्षण (Protect), प्रतिसाद व प्रतिबंध (Remediate), सुलभता व प्रोत्साहन (Facilitate) आणि क्षमता विकास (Build). रिअल-टाइम सायबर गुप्त माहिती, आधुनिक सुरक्षा चौकटींचा स्वीकार, Zero Trust आर्किटेक्चरचा प्रसार आणि AI आधारित सुरक्षा प्रणाली यावर विशेष लक्ष दिले जाईल. तसेच विशेष प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यक्रमांद्वारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यावर भर असेल.

संस्थापक सदस्य म्हणून Zscaler आणि एअरटेल आपल्या तांत्रिक क्षमतांचा एकत्रित वापर करतील. Zscaler कडून समर्पित सायबर धोका संशोधन टीम भारतासाठी कार्यरत राहील आणि Zero Trust Exchange प्लॅटफॉर्मद्वारे दररोज अब्जावधी व्यवहारांमधून सायबर गुप्त माहिती संकलित केली जाईल. एअरटेल IoT व मोबाइल ट्रॅफिकवरील सखोल दृश्यता उपलब्ध करून देत नेटवर्क निरीक्षण आणि नवीन सुरक्षा उपाय विकसित करण्यात सहकार्य करेल.

भारती एअरटेलचे उपाध्यक्ष गोपाल विट्टल यांनी सांगितले की, ग्राहक व देशाच्या डिजिटल परिसंस्थेचे संरक्षण ही एअरटेलची बांधिलकी असून, या भागीदारीमुळे सुरक्षित आणि सशक्त डिजिटल भारत घडवण्यास मदत होईल. तर Zscaler चे मुख्य कार्यकारी अधिकारी जय चौधरी यांनी नमूद केले की, पारंपरिक सुरक्षा मॉडेल्स पुरेसे नसून सुरक्षितता-आधारित आधुनिक Zero Trust आर्किटेक्चरची आवश्यकता आहे.

# पॅनासोनिककडून 'रोमा अर्बन स्मार्ट टच' सिरीज लाँच

- आधुनिक घरांसाठी तंत्रज्ञान व आकर्षकतेचा संगम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




Panasonic Life Solutions India ने 'रोमा अर्बन स्मार्ट टच' सिरीजचे अधिकृत लाँच जाहीर करत भारतातील स्मार्ट होम सोल्यूशन्स क्षेत्रात नवे पाऊल टाकले आहे. हे नेक्स्ट-जनरेशन आयओटी-आधारित स्विच सोल्यूशन आधुनिक कुटुंबांच्या सोयी, सुरक्षितता आणि कार्यक्षम जीवनशैली लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आले आहे.

नवीन 'रोमा अर्बन स्मार्ट टच' स्विच वापरकर्त्यांना मोबाइल ॲप, व्हॉइस कमांड्स आणि फेदर-टच फिजिकल स्विच अशा तीन माध्यमांतून इलेक्ट्रिकल उपकरणांवर नियंत्रण ठेवण्याची सुविधा देतो. या हायब्रिड कंट्रोल मॉडेलमुळे स्मार्ट तंत्रज्ञानाची सोय मिळतेच, पण पारंपरिक मॅन्युअल वापराची सवयही कायम ठेवता येते.

ही आयओटी स्विच सिरीज तंत्रज्ञानप्रेमी व्यावसायिक, प्रीमियम गृहखरेदीदार, आर्किटेक्ट्स आणि इंटीरियर डिझाइनर्स यांच्यासाठी विशेष आकर्षण ठरत आहे. लाइट्स, पंखे, एअर कंडिशनर्स, टेलिव्हिजन यांसारख्या विविध उपकरणांचे नियंत्रण एकाच प्लॅटफॉर्मवरून करता येते, त्यामुळे स्मार्ट होम सेटअप अधिक सुलभ होते.

या सिरीजची खासियत म्हणजे तिची 'रेट्रोफिट' सुसंगतता. नवीन तसेच जुन्या घरांमधील विद्यमान वायरिंगवरच हे स्विच कार्य करतात. अतिरिक्त वायरिंग किंवा स्वतंत्र गेटवे डिव्हाइसची आवश्यकता नसल्याने इंस्टॉलेशनचा खर्च, वेळ आणि गुंतागुंत लक्षणीयरीत्या कमी होते.

# 'राजा हिंदुस्तानी' अल्बममधून किंगचा नवा सलाम

## दिग्गज कलाकारांसोबत सुरेल संगम



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पॉप आयकॉन King याने आपला आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाकांक्षी अल्बम Raja Hindustani सादर करत भारतीय संगीत परंपरेला आधुनिक पॉप शैलीत नवे रूप दिले आहे. भारताच्या समृद्ध संगीत ओळखीला अभिवादन करत हा अल्बम त्या ध्वनीविश्वाला जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा प्रयत्न करतो.

Warner Music India द्वारे प्रदर्शित या अल्बममध्ये किंगने सुरेल कथनशैली आणि भावनिक संगीताचा संगम साधत भारतीय संगीत क्षेत्रातील दिग्गज आवाजांसोबत सहकार्य केले आहे. यात Shreya Ghoshal, Sunidhi Chauhan, Shaan, Kumar Sanu आणि Rekha Bhardwaj यांसारख्या नामवंत कलाकारांचा सहभाग आहे. या सहकार्यामुळे भारतीय संगीताची परंपरा आणि आधुनिक ध्वनी यांचा अनोखा मिलाफ घडतो. अल्बममधील पहिली दोन सिंगल्स "कमाल है" आणि "जो इश्क हुआ" सुरेल आणि भावनात्मक प्रवासाची दिशा ठरवतात. "मजा प्यार करने में" हे गाणे रोमँटिक केंद्रबिंदू ठरत असून किंग आणि कुमार सानू यांचा आवाज नॉस्टॅल्जिया आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवतो. या गाण्याच्या व्हिडिओमध्ये दोघेही एकत्र दिसत असल्याने पिढ्यांना जोडणारा खास क्षण निर्माण झाला आहे.

यानंतर सुनिधी चौहानसोबतचे "ये दिल मुझको तू दे दे" रेगे शैलीचा स्पर्श देत ऊर्जा निर्माण करते, तर शानसोबतचे "ये सफर" मैत्री आणि सहप्रवासाची उबदार भावना व्यक्त करते. श्रेया घोषालसोबतचे "हाल ए दिल" शांत आणि भावपूर्ण वातावरण तयार करते, तर रेखा भारद्वाज "वो पहला अक्षर" या गाण्यात काव्यात्म गूढता आणतात. "आहिस्ता आहिस्ता" या सोलो ट्रॅकसह अल्बमचा भावपूर्ण शेवट होतो.



## ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया प्रथमच

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

भारतातील एअर कार्गो आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी 2026 हे वर्ष महत्त्वपूर्ण ठरणार असून Air Cargo India 2026 च्या 11व्या आवृत्तीबरोबरच Transport Logistic India 2026 या नव्या प्रदर्शनाची पहिली आवृत्ती आयोजित करण्यात येत आहे. हा संयुक्त कार्यक्रम 25 ते 27 फेब्रुवारीदरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार असून आयोजन Messe Muenchen India यांच्या वतीने करण्यात येत आहे. या वर्षी एअर कार्गो इंडिया प्रदर्शनाचे क्षेत्रफळ मागील आवृत्तीपेक्षा तब्बल 43 टक्क्यांनी वाढवण्यात आले आहे.

# २७ फेब्रुवारीला 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम'चा प्रीमियर

## मराठी भाषा गौरव दिनी प्रेक्षकांसाठी खास भेट

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

चित्रपटगृहात प्रेक्षकांची पसंती मिळवलेल्या 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या लोकप्रिय मराठी चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर २७ फेब्रुवारी २०२६ रोजी ZEE5 या ओटीटी प्लॅटफॉर्मवर होणार आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने हा चित्रपट प्रेक्षकांसाठी उपलब्ध होत असल्याने या प्रीमियरला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याचा आनंद, जिद्द, सांस्कृतिक ओळख आणि मातृभाषेचा अभिमान या विषयांवर आधारित हा चित्रपट संवेदनशील सामाजिक आशय मांडतो. बदलत्या काळात मराठी शाळांना भेडसावणाऱ्या आव्हानांचा वेध घेत, आपली मुळे जपत पुढे जाणाऱ्या एका शाळेचा आणि त्या शाळेशी जोडलेल्या माणसांचा भावनिक प्रवास या चित्रपटात प्रभावीपणे साकारण्यात आला आहे.

हेमंत ढोमे दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती क्षिती जोग, विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांनी केली आहे. सचिन खेडेकर, अमेय वाघ, प्राजक्ता कोळी, क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर आणि कादंबरी कदम अशा दर्जेदार कलाकारांच्या अभिनयामुळे चित्रपटाला विशेष उंची प्राप्त झाली आहे.




चित्रपटाच्या डिजिटल प्रदर्शनाबाबत ZEE5च्या मराठी विभागाच्या प्रमुख हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, मराठी भाषा गौरव दिन हा राज्याच्या सांस्कृतिक ओळखीचा उत्सव आहे. मराठी भाषा आणि मराठी शाळांचे महत्त्व अधोरेखित करणारी ही कथा अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आनंद ZEE5ला होत आहे. मराठी प्रेक्षकांना त्यांच्या भाषेत उत्कृष्ट कथा अनुभवता याव्यात, यासाठी ZEE5 कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'लँग्वेज पॅक' उपक्रमामुळे मराठी कंटेंट अधिक सुलभ आणि व्यापकपणे उपलब्ध होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

निर्माती आणि अभिनेत्री क्षिती जोग यांनी सांगितले की, हा चित्रपट एका भावनिक जाणीवेतून साकारला आहे. मातृभाषेतील शिक्षण हे केवळ भाषेपुरते मर्यादित नसून ओळख, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक सातत्याशी जोडलेले आहे, हा संदेश या चित्रपटातून दिला आहे. चित्रपटगृहांनंतर आता जागतिक ओटीटी प्लॅटफॉर्मवर पोहोचत असल्याने नव्या प्रेक्षकांपर्यंत ही कथा पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी हा चित्रपट मराठी माध्यम शाळांचा आणि त्यांच्या भावविश्वाचा उत्सव असल्याचे सांगितले. चित्रपटगृहांमध्ये मिळालेल्या प्रतिसादानंतर आता डिजिटल माध्यमातून अधिक घरांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

# अनन्या पांडेसह ऑरेलियाचे 'स्प्रिंग समर २०२६' कलेक्शन लाँच

- भारतीय एथ्निक फॅशनमध्ये 'ट्रेंड फॉरवर्ड' स्थान अधिक मजबूत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




महिलांच्या एथ्निक फॅशनमधील लोकप्रिय ब्रँड ऑरेलिया ने बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे हिच्यासह 'स्प्रिंग समर २०२६' (SS'26) कलेक्शनचे अनावरण करत भारतीय कपड्यांच्या बाजारात 'ट्रेंड फॉरवर्ड' ब्रँड म्हणून आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. #HameshaTrending या मोहिमेद्वारे सादर करण्यात आलेले हे कलेक्शन आधुनिक शैली, आराम आणि भारतीय सौंदर्यशास्त्राचा समतोल साधणारे आहे. आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लिमिटेड अंतर्गत कार्यरत असलेल्या ऑरेलियाने फॅशनप्रेमी तरुण महिलांसाठी तयार केलेल्या या कलेक्शनमधून बदलत्या प्रवाहांशी सुसंगत राहण्याचा संदेश दिला आहे. पारंपरिकतेला जपत आधुनिकता स्वीकारणाऱ्या महिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव या कलेक्शनद्वारे करण्यात आला आहे. या नवीन कलेक्शनमध्ये अद्ययावत कुर्ता सिल्हुएट्स, फ्लुइड को-ऑर्ड सेट्स, वैशिष्ट्यपूर्ण नेकलाइन्स, खेळकर बाह्या, सौम्य रंगछटा आणि आधुनिक फुलांच्या डिझाइन्सचा समावेश आहे. हलक्या, घाम शोषणाऱ्या आणि मिश्र कापडांपासून तयार केलेले हे पोशाख उन्हाळ्यासाठी विशेष अनुकूल असून आराम आणि शैली यांचा समतोल राखतात. दैनंदिन वापर, उत्सव, प्रवास तसेच खास प्रसंगांसाठी विविध पर्याय या कलेक्शनमध्ये उपलब्ध आहेत.

टीसीएनएस विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत दागा यांनी सांगितले की, बदलत्या फॅशन ट्रेंडशी जुळवून घेणाऱ्या महिलांसाठी ऑरेलिया सातत्याने पसंतीचा ब्रँड ठरला आहे. 'स्प्रिंग समर २०२६' कलेक्शन आणि #HameshaTrending मोहिमेद्वारे भारतीय एथ्निक फॅशनमध्ये 'गो-टू डेस्टिनेशन' म्हणून ब्रँडची ओळख अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उपलब्धता, आरामदायित्व आणि समावेशकता यावरही कंपनीचा विशेष भर असल्याचे त्यांनी नमूद केले. या कलेक्शनमध्ये नऊ वेगवेगळ्या ट्रेंड स्टोरीज सादर करण्यात आल्या आहेत. बोल्ड फ्लोरल्सपासून कुर्ते, ड्रेसेस, कफ्तान, को-ऑर्ड सेट्स आणि थ्री-पीस ऑन्सेम्बल्सपर्यंत विविध पोशाख प्रकार यात समाविष्ट आहेत. समर डेनिम्स, वेस्टकोट सेट्स, स्पॅगेटी स्ट्रॅप्स आणि हॉल्टर नेकलाइन्ससारख्या आधुनिक डिझाइन्समुळे कलेक्शनला वेगळी ओळख मिळाली आहे. तसेच पारंपरिक फारशी सलवार आधुनिक शैलीत पुन्हा सादर करण्यात आली आहे. शिफली डिटेलिंग, हलके पोत आणि कारागिरीमुळे पोशाख अधिक आकर्षक बनले आहेत. 'मॉम अँड मी' श्रेणीद्वारे आई-मुलींसाठी समन्वयित डिझाइन्स देत फॅशनमध्ये कौटुंबिक जोडणीचा नवीन ट्रेंडही या कलेक्शनमध्ये दिसून येतो. स्प्रिंग समर २०२६ कलेक्शनमधून ऑरेलियाने फॅशन ही प्रवाहासोबत राहणारी, सहज स्वीकारता येणारी आणि मूळ भारतीय ओळख जपणारी असावी, हा संदेश दिला आहे.



## COMED-K आणि Uni-GAUGE 2026 प्रवेश परीक्षा ९ मे रोजी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशभरातील अभियांत्रिकी प्रवेशासाठी महत्त्वाची मानली जाणारी COMED-K UGET आणि Uni-GAUGE 2026 ही संयुक्त राष्ट्रीय प्रवेश परीक्षा शनिवार, ९ मे २०२६ रोजी होणार आहे. या परीक्षेला देशभरातून सुमारे १.४० लाख विद्यार्थी बसण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. ही परीक्षा कर्नाटकातील १५० हून अधिक खासगी अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच देशभरातील ३० पेक्षा अधिक प्रतिष्ठित खाजगी, स्वयं-अर्थसहाय्यित आणि अभिमत विद्यापीठांमध्ये बी.ई./बी.टेक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळवून देणारा महत्त्वाचा मार्ग ठरते.

# 'POVA Curve 2' स्मार्टफोन विक्रीसाठी उपलब्ध

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

दमदार बॅटरी, स्लिम डिझाइन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा संगम असलेला 'POVA Curve 2' स्मार्टफोन आजपासून भारतीय बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. ८०००mAh क्षमतेची बॅटरी असूनही केवळ 7.42 मिमी जाडी आणि 195 ग्रॅम वजन असलेला हा स्मार्टफोन 'जगातील सर्वात बारीक 8000mAh फोन' म्हणून सादर करण्यात आला आहे.

स्लिम, वक्र आणि आकर्षक डिझाइनसह तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये आधुनिक वापरकर्त्यांच्या सतत कनेक्टेड राहण्याच्या गरजा लक्षात घेऊन तंत्रज्ञानाची मांडणी करण्यात आली आहे. काम, मनोरंजन आणि प्रवास यांसारख्या दैनंदिन वापरासाठी दीर्घकाळ टिकणारी बॅटरी ही या फोनची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.





POVA Curve 2 दोन स्टोरेज पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. 8GB + 128GB व्हेरिएंटची किंमत 27,999 रुपये तर 8GB + 256GB व्हेरिएंटची किंमत 29,999 रुपये ठेवण्यात आली आहे. हा स्मार्टफोन फ्लिपकार्ट तसेच देशभरातील निवडक रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असून बँक व NBFC भागीदारांकडून 3,000 रुपयांपर्यंत कॅशबॅक ऑफरही दिली जात आहे.

या फोनमध्ये 144Hz वक्र AMOLED डिस्प्ले देण्यात आला असून डोळ्यांचा ताण कमी करण्यासाठी 'आय-कम्फर्ट' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. दीर्घकाळ वापर करतानाही स्मूद आणि स्पष्ट व्हिज्युअल अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे.

कनेक्टिव्हिटीच्या बाबतीत POVA Curve 2 विशेष ठरतो. हा फोन ट्रिपल-चिपसेट तंत्रज्ञानासह येतो. यात सिग्नल चिपसेट (G1), स्वतंत्र वाय-फाय चिपसेट (SE1) आणि मीडियाटेक D7100 प्रोसेसरचा समावेश आहे.

# Vivo V70 आणि V70 Elite भारतात लाँच

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**




- 50MP Zeiss टेलिफोटो, फ्लॅगशिप परफॉर्मन्स आणि AI इमेजिंगसह सुरुवात ₹45,999 पासून

Vivo India ने भारतीय बाजारात आपली नवीन प्रीमियम स्मार्टफोन सिरीज Vivo V70 आणि Vivo V70 Elite लाँच केली आहे. आकर्षक डिझाइन, फ्लॅगशिप-लेव्हल परफॉर्मन्स आणि 50-मेगापिक्सेल Zeiss टेलिफोटो कॅमेरासह ही सिरीज सादर करण्यात आली असून किंमत ₹45,999 पासून सुरू होते. Vivo V70 Elite मध्ये फ्लॅगशिप Snapdragon® 8S Gen 3 प्रोसेसर देण्यात आला असून तो वेगवान आणि ऊर्जा-कार्यक्षम कामगिरी देतो. फोनमध्ये 1.5K अल्ट्रा-क्लिअर OLED डिस्प्ले असून सेगमेंटमधील सर्वात पातळ 0.125 सेमी बेझल डिझाइन दिले आहे. एरोस्पेस-ग्रेड ॲल्युमिनियम फ्रेममुळे फोनला प्रीमियम आणि मजबूत लुक मिळतो.

दोन्ही मॉडेल्समध्ये AI-आधारित वैशिष्ट्ये फोटो अधिक आकर्षक आणि नैसर्गिक बनवतात. V70 आणि V70 Elite मध्ये Vivo-Zeiss सह-इंजिनिअर्ड इमेजिंग सिस्टीम देण्यात आली आहे. 50MP Zeiss नाईट टेलिफोटो कॅमेरा Sony IMX882 सेन्सरसह येतो. 1.3 सेमी मोठा सेन्सर आणि NICE 2.0 लाईट तंत्रज्ञानामुळे कमी प्रकाशातही स्पष्ट आणि तपशीलवार फोटो कॅप्चर करता येतात.

# ॲक्सिस कॅपिटलची सिग्नेचर ग्लोबल 'खरेदी करण्याची' शिफारस

## व्यावसायिक विकास क्षेत्रात कंपनीच्या प्रवेशामुळे २२ टक्के वाढीचा अंदाज

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ब्रोकरेज फर्म ॲक्सिस कॅपिटलने सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडसाठी 'बाय' रेटिंग देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने नुकतीच आरएमझेड सोबत भागीदारीद्वारे व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्रात प्रवेशाचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. हा कंपनीच्या वाढीचा प्रमुख चालक असल्याचा दाखला ॲक्सिस कॅपिटलने दिला आहे.

ॲक्सिस सिक्युरिटीजने कंपनीचे 'बाय' रेटिंग १,३०० रुपयांच्या लक्ष्य किमतीसह कायम ठेवले आहे. या स्टॉकच्या किमतीत २२ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता त्यातून दर्शविण्यात आली आहे. सिग्नेचर ग्लोबलचा शेअर १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरुवातीच्या व्यवहाराच्या वेळेत प्रति शेअर १०७०.१० रुपयांवर उघडला.

ॲक्सिस कॅपिटलने त्यांच्या अहवालात सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडवरील 'बाय' शिफारसीमागील खालील घटकांवर प्रकाश टाकला आहे. सिग्नेचर ग्लोबलने आपल्या विविधीकरण धोरणाच्या अनुषंगाने, दक्षिण भारतातील आघाडीचे लीजिंग ॲसेट डेव्हलपर असलेल्या आरएमझेडसोबत संयुक्त उपक्रमाद्वारे व्यावसायिक रिअल इस्टेट विभागात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे.

सुमारे ५५ लाख चौरस फूट नियोजित भाडेपट्टा क्षेत्रासह कार्यालय-केंद्रित, संमिश्र वापराच्या ग्रेड-ए मालमत्तेच्या विकासाचा या भागीदारीमध्ये समावेश आहे. कार्यालयीन जागेसोबतच किरकोळ आणि हॉटेल घटकांचाही या प्रकल्पात समावेश असेल. ही मालमत्ता गुरुग्राममधील सेक्टर ७१ मधील सदर्न पेरिफेरल रोड येथे असेल. सिग्नेचर ग्लोबलकडे कार्यान्वयाच बळकट क्षमता आणि विकासाचा अनुभव आहे, तर आरएमझेड संस्थात्मक दर्जाच्या व्यावसायिक मालमत्तेची संकल्पना आणि विकास करण्यातील तिच्या तज्ज्ञतेचा वापर करेल. हे बांधकाम पुढील सहा ते नऊ महिन्यांत सुरू होण्याची अपेक्षा असून हा प्रकल्प सुमारे पाच वर्षांत पूर्ण होईल. तो पूर्ण झाल्यानंतर कंपनीला ऑफिस आणि रिटेल विभागांमधून अनुक्रमे प्रति चौरस फूट अंदाजे १२५ रुपये आणि प्रति चौरस फूट २५० रुपये मासिक भाडे मिळण्याची अपेक्षा आहे. या व्यवहाराचा एक भाग म्हणून आरएमझेड ही सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडच्या पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या गुरुग्राम कॉमर्सिटी लिमिटेडमध्ये (जीसीएल) ५० टक्के इक्विटी हिस्सा मिळवण्याच्या बदल्यात १२.८ अब्ज रुपये गुंतवेल.या कंपनीची एकूण विकासक्षमता सुमारे ७५ लाख चौरस फूट एवढी आहे.



त्यापैकी जवळजवळ ७० टक्के (अंदाजे ५५ लाख चौरस फूट) व्यावसायिक विकासासाठी राखीव आहे, तर उर्वरित क्षेत्र निवासी वापरासाठी नियुक्त केले आहे.

"या मालमत्तेसाठी अजून पाच वर्षे बाकी आहेत. त्यामुळे, आर्थिक वर्ष २८ पूर्वीपर्यंत आमच्या महसूल/कमाईच्या अंदाजांवर तिचा परिणाम होईल, असे आम्हाला वाटत नाही. या व्यवहारात जमिनीचे मूल्य २६ अब्ज रुपये असल्याचे सूचित केले असले तरी आम्ही ३४ अब्ज रुपयांचे विकासमूल्य निश्चित केले आहे. भांडवली खर्च आणि भविष्यातील सवलती यांचा विचार करता ते वाजवी वाटते. आम्ही आमचा टीपी रु. १३०० एवढा कायम ठेवला आहे," असे ॲक्सिस कॅपिटलने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.